राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




ई मासिक विद्यासंवाद

मार्च २०२४ | आवृत्ती-०९

# नवनवीन रूपात येतोय इतिहास - डॉ. राजा दीक्षित




विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

ई मासिक **विद्यासंवाद**

मार्च २०२४ | आवृत्ती-०९



मार्गदर्शक

**डॉ. प्रशान्त बोकारे**

**प्रभारी कुलगुरु**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**

प्र-कुलगुरु

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक

**डॉ. राजू हिवसे**

**कुलसचिव**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक

**श्री. प्रेमदास वाडकर**

**जनसंपर्क अधिकारी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक

**श्री. प्रवीण गोतमारे**

**प्रकाशन अधिकारी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर




मा. राज्यपाल

**श्री. रमेश बैस**



मा. प्रभारी कुलगुरु

**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्र-कुलगुरु

**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव

**डॉ. राजू हिवसे**




# इतिहास परिषदेचे 56 वे अधिवेशन







आभासी इतिहास, नवखा इतिहास, फुरसती इतिहास, छंदिष्ट इतिहास, अशा नवनवीन रूपात इतिहास येत असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. राजा दीक्षित यांनी बीजभाषण करताना केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे आयोजित इतिहास परिषदेचे ५६ वे अधिवेशनाचे उद्घाटन कार्यक्रमात डॉ. दीक्षित बीजभाषण करताना शुक्रवार, दिनांक १ मार्च २०२४ रोजी बोलत होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या इतिहास परिषदेचे आयोजन विद्यापीठाचा पदव्युत्तर इतिहास विभाग, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभाग आणि प्रवास व पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या इतिहास परिषदेच्या उद्घाटन समारंभाला अध्यक्षस्थानी माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रमुख अतिथी म्हणून मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे मानद सचिव श्री. संदीप जोशी, बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. राजा दीक्षित, विशेष अतिथी म्हणून इतिहास भाष्यकार व वरिष्ठ तांत्रिक अधिकारी पोलीस विभाग श्री. प्रवीण योगी, जिजामाता महाविद्यालय बुलढाणा येथील प्राचार्य तथा परिषदेचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. प्रशांत कोठे, गोंडवाना विद्यापीठाचे इतिहास मंडळ अध्यक्ष डॉ. प्रकाश शेंडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ इतिहास मंडळाचे अध्यक्ष डॉ. नामदेव ढाले, स्वागताध्यक्ष अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, परिषद सचिव डॉ. रवींद्र लोणारे, स्थानिक सचिव डॉ. रामभाऊ कोरेकर यांची उपस्थिती होती. विषयाची स्थिती, तत्त्वज्ञान स्थिती, व्याप-विस्तार, संकल्पनेत होणारे बदल यावर चर्चा करण्याकरिता परिषद भरवतो. सद्यस्थितीत सामाजिक शास्त्र विषयातील ज्ञानात बदल होत आहे इतिहासाला देखील भाषाशास्त्रीय, भौतिकशास्त्रीय वळण आले आहे संकल्पना बदलत आहे. त्यामुळे इतिहास म्हणजे काय? याचे विचारमंथन सुरू असल्याचे बीजभाषण करताना डॉ. राजा दीक्षित यांनी सांगितले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम विद्याशाखेस त्यांनी नवीन निर्मिती म्हणजेच इतिहासातील नवीन बंडखोरी असल्याचे म्हटले आहे. जगात इतिहासाबाबत मंथन होत असून अनेक समांतर प्रवाह आहे. अमेरिका, दक्षिण आफ्रिका, भारत तसेच महाराष्ट्रातील प्रवाहांची त्यांनी माहिती दिली.

## नवीन पिढीला प्रेरणा मिळेल - डॉ. प्रशान्त बोकारे

इतिहासातून नवीन पिढीला प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी अध्यक्षीय भाषण करताना केले. इतिहास विषयी परिषद होणे काळाची गरज आहे. जेत्यांनी लिहिलेला इतिहास त्यांच्या पराक्रमाला कितपत न्याय असतो हा संशोधनाचा विषय आहे. सिकंदर आणि पोरस यांच्या लढाईचे उदाहरण त्यांनी दिले. पोरस पराभूत असला तरी त्याला

काय संघर्ष करावा लागला ते देखील महत्त्वाचे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करीत खरा इतिहास समोर आणणे समाजासाठी प्रेरणादायी ठरेल. पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला असाच इतिहास आपणास शिकवला. मात्र, महादजी शिंदे यांनी दिल्लीत काय पराक्रम केला याचा इतिहास समोर आला नाही. पराभव असो वा जिंकणे यातून काहीतरी प्रेरणा मिळेल. या आव्हानाला सामोरे जात या परिषदेत ॲक्शन प्लॅन निश्चित करण्याचे आवाहन डॉ. बोकारे यांनी केले.

उद्घाटन समारंभात इतिहास परिषदेच्या अधिवेशनाची भूमिका विद्यापीठाचे मानवशास्त्र विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मांडली. दोन दिवसीय अधिवेशनाच्या कार्यक्रमाची रूपरेखा त्यांनी सांगितले. विद्यापीठामध्ये तिसऱ्यांदा इतिहास परिषदेचे अधिवेशन होत असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक करताना परिषदेचे सचिव डॉ. रवींद्र लोणारे यांनी परिषदेच्या आयोजन बाबत तसेच अतिथींबाबत माहिती दिली. तत्पूर्वी भारतीय पुरातत्व विभाग आणि विद्यापीठाच्या वतीने लावण्यात आलेल्या प्रदर्शनीचे उद्घाटन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे व अतिथींच्या शुभहस्ते फीत कापून करण्यात आले. उद्घाटन समारंभाचे संचालन स्थानिक सचिव डॉ. रामभाऊ कोरेकर यांनी केले तर आभार डॉ. सचिन भोगेकर यांनी मानले.

## भारताला विकसित बनविण्यात तरुणांचे योगदान महत्त्वपूर्ण - डॉ. संजय दुधे
### विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेचा युवा संवाद कार्यक्रम

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्यात तरुणांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवा संवाद कार्यक्रम शनिवार, दिनांक २ मार्च २०२४ रोजी दीक्षांत सभागृहात पार पडला युवा संवादचे उद्घाटन करताना डॉ. दुधे बोलत होते.




माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, वक्ता म्हणूनविद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक व डॉ. एम. के. उमाटे महाविद्यालयातील डॉ. विनोद खेडकर उपस्थित होते. रासेयोच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत करीत डॉ. दुधे यांनी भारत हा तरुणांचा देश म्हणून जगात क्रमांक एक वर असल्याचे सांगितले. तरुण हे देशाचे भविष्य, आधार असून तरुण जितका धावेल तितका देश विकसित होईल, असे त्यांनी सांगितले. २०४७ मध्ये भारताला जगात क्रमांक १ चे म्हणजेच महासत्ता बनवायचे आहे. भारताला महासत्ता बनवणे हे तरुणांच्या हाती असल्याचे त्यांनी सांगितले. भारताला विश्वगुरू बनविण्याकरिता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत ही संकल्पना केली आहे. याकरिता तरुणांमध्ये जागृती करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना राष्ट्रीय संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी युवा संसद कार्यक्रम आयोजनामागील भूमिका सांगितली. युवा संसद हा कार्यक्रम देशातील संपूर्ण विद्यापीठात राबविला जात आहे. संपूर्ण भारतात युवा जागृती होणे गरजेचे आहे. भारताला तरुण नेतृत्वाची गरज असून २०४७ मध्ये भारत महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल व्हावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरुणांना काय अपेक्षित आहे. याची माहिती या कार्यक्रमाच्या माध्यमातून जाणून घेतली जाणार आहे. युवा संवाद कार्यक्रमातील वक्ते विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना पंचप्राण समजावून सांगितले. युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागील भूमिका त्यांनी विशद केली. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याची ब्ल्यू प्रिंट ठरवायची आहे. भारत हा जगातील सर्वात तरुण देश राहणार आहे. त्यामुळे अन्य जगाचे लक्ष भारतावर राहणार आहे. देशाला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दृष्टीने कोणत्या अडचणींवर मात करावी लागणार आहे याबाबत डॉ. पाठक यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. दुसरे वक्ते डॉ. विनोद खेडकर यांनी देखील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार श्री प्रकाश शुक्ला यांनी मानले. कार्यक्रमाला नागपूर शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## हवाई क्षेत्र व पर्यटन व्यवसायातील संधीबाबत कार्यशाळा

### विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रवास व पर्यटन विभागात हवाई क्षेत्र व पर्यटन व्यवसायातील संधी या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन गुरुवार, दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. प्रवास व पर्यटन विभागाचे संचालक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेत अध्यक्षस्तरीय भाषण करताना संचालक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विभागाची वाटचाल आणि होत असलेल्या विकास कामाची माहिती दिली. प्रमुख वक्ता ट्रेंड्झ या पर्यटन कंपनीचे संचालक मिहीर देशपांडे यांनी इंडिगो एअर लाईन्सचा स्वतःचा अनुभव सांगितला. एअर लाईन्स व विमानतळावर कश्या प्रकारचे रोजगार असतात व तिथे कश्याप्रकारे काम चालते याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बोर्डिंग पास ते बैगेज ब्रेक अप, स्क्रीनिंग इत्यादीची माहिती विद्यार्थ्यांना त्यांनी दिली. दुसरे प्रमुख पाहुणे फ्लाई हाई इन्स्टिट्यूट नागपूर येथील इन्स्ट्रक्टर आशुतोष रामटेके यांनी कैबिन क्रिवचा त्यांच्या प्रवास याबाबत माहिती दिली. विविध देशाला दिलेल्या भेटी याचे स्वअनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांना कैबिन क्रीव्ह, ग्राउंड स्टाफमध्ये काय काय संधी आहेत याबाबत मार्गदर्शन केले. तिसरे प्रमुख पाहुणे फ्लाई हाई इंस्टिट्यूट नागपूर येथे फैकल्टी अशोक भट्टाचार्य यांनी पर्यटन व्यवसायातील एकाग्रतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांचा अनुभव त्यांनी शेयर केला तसेच पर्यटन व्यवसायात ग्राउंड स्टाफमध्ये पर्यटन विद्यार्थ्यांना असलेल्या १४ प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.मंजुषा डोंगरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. भाग्यश्री हिरादेवे, रामदास बागडे, दीपक उईके यांनी करून दिला. आभार नरेश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.अरविंद उपासनी, डॉ.अमरदीप बारसागडे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुराडकर व विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.







## इतिहास लढाई पुरताच मर्यादित नाही - डॉ. ग. का. माने

### इतिहास परिषदचे ५६ वे अधिवेशन

इतिहास केवळ लढाई पुरताच मर्यादित नसल्याचे प्रतिपादन केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती येथील माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. ग. का. माने यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या इतिहास परिषदेचे आयोजन विद्यापीठाचा पदव्युत्तर इतिहास विभाग, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभाग आणि प्रवास व पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अधिवेशनाचा समारोप शनिवार दिनांक २ मार्च २०२४ करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. माने बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी म्हणून केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती येथील माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. ग. का. माने, आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालय येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सतिश चाफले, स्वागताध्यक्ष अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, परिषद सचिव डॉ. रवींद्र लोणारे, स्थानिक सचिव डॉ. रामभाऊ कोरेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. माने यांनी सिंधू संस्कृती ते आधुनिक कालखंडातील इतिहासाच्या फरकाबाबत माहिती दिली. मानवी जीवनात आलेल्या बदलाची त्यांनी माहिती दिली. पर्यावरणामुळे देखील मनुष्याचे खानपान, जीवनपद्धती यात फरक पडल्याचे माने यांनी सांगितले. त्यामुळे इतिहास हा बहुआयामी असून वेगवेगळ्या दृष्टिकोनातून इतिहास शिकायला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी इतिहास हा भूतकाळ तर समाजशास्त्र वर्तमान काळातील घटनांचे अध्ययन करीत असतो, असे सांगितले. भूतकाळातील घटनांचा अभ्यास करीत वर्तमान काळ बोध घेत असल्याने इतिहास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख अतिथी डॉ. सतिश चाफले यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. समारोपिय कार्यक्रमाचे संचालन स्थानिक सचिव डॉ. रामभाऊ कोरेकर यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मानले.

## माजी विद्यार्थी निधीतून आर्थिक मदतीचा ठराव

इतिहास परिषदेच्या निमित्ताने विविध ठराव या अधिवेशनात मांडण्यात आले. इतिहास विभागातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, संशोधनास आर्थिक मदत, सांस्कृतिक, खेळ, शैक्षणिक सहल, शैक्षणिक परिषद यामध्ये सहभागी होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी निधीतून आर्थिक मदत देण्याचा ठराव मांडण्यात आला. इतिहास संशोधन केंद्र करिता सेवानिवृत्त प्राध्यापकांनी त्यांच्याकडील पुस्तके दान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यापूर्वी दिवंगत डॉ. बी. आर. अंधारे यांनी २ हजार पुस्तके, डॉ. श्याम कायंदे, डॉ. विनोद देवपुजारी व डॉ. शुभा जोहरी यांनी देखील पुस्तके दान केली आहेत.

## भाऊसाहेब देशमुख विलोभनीय व्यक्तिमत्व

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे विदर्भाला लाभलेले विलोभनीय व्यक्तिमत्व होते, असे मत परिसंवादाच्या अध्यक्ष डॉ. मीनल खेरडे यांनी व्यक्त केले. इतिहास परिषदेत 'डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्य' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. यामध्ये वक्त्यांनी भाऊसाहेबांच्या वैविध्यपूर्ण व्यक्तिमत्वाबाबत त्यांच्या भाषणातून माहिती दिली. कृषी विषयी चर्चा निघाली की भाऊसाहेबांचा नक्कीच उल्लेख होतो. परिसंवादात डॉ.ओमप्रकाश बोबडे, डॉ. किशोर चौरे, डॉ. माधुरी पाटील, डॉ. अभिलाषा राऊत, डॉ. श्रीकांत पानघाटे, डॉ. योगेश भोयर, डॉ. प्रा. प्रीतम गावंडे यांनी परिसंवादात सहभाग घेतला.

## स्त्रियांनी अस्तित्व जोपासले पाहिजे - डॉ. सुचिता दलाल
### जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील चर्चासत्रात सहभाग




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या प्रमुख डॉ. सुचिता दलाल यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली येथे झालेल्या चर्चासत्रात सहभाग नोंदविला. महर्षी दयानंद यांच्या २०० व्या जयन्ती निमित्ताने जेएनयूमधील संस्कृत एवं प्राच्यविद्या अध्ययन संस्थान तसेच महर्षी सान्दीपनी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान उज्जैन यांच्या संयुक्त विद्यमाने 'वैदिक वाङ्मयातील राष्ट्रीय चेतना या विषयावर' राष्ट्रीय वैदिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

स्वतंत्रता आंदोलनात महर्षी दयानंद यांचा अतुलनीय सहभाग होता. भारतीय शास्त्रपरंपरा, ज्ञानपरंपरा सुरक्षित ठेवणे या परंपरेला संवर्धित करणे, हा दयानंदाचा मूळ उद्देश होता. वैदिक चर्चासत्राचा प्रारंभ वेदमंत्रपठनाने- घनपाठाद्वारे करण्यात आला. प्रो. सतिशचन्द्र गडकोटी यांनी उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले. मुख्य - अतिथी म्हणून राष्ट्रीय संस्कृत संस्थानचे कुलपती प्रो. श्रीनिवास वरखेड़ी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पद्मश्री डॉ. सुकामा आचार्य सारस्वत अतिथी होत्या, संगोष्ठी बीजभाषण डॉ. ज्वलंतकुमार यांनी केले. 'वेदिक वाङ्मयास महर्षी दयानंदांचे योगदान' या विषयावरील सत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील स्नातकोत्तर संस्कृतच्या विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. शुचिता दलाल यांनी अध्यक्षस्थान भूषविले. देवानंदाच्या चरित्रात स्त्रियांसाठी त्यांनी केलेले कार्य, पाठशाळा स्थापित करणे, मूर्तीपूजा व पुराणकथा विरोध, कन्याविक्रीचा विरोध इ. घटकांवर डॉ. शुचिता दलाल यांना स्वतःचे मत प्रस्तूत केले. सद्यस्थितीत स्त्रीयांनी स्व:ताचे अस्तित्व जोपासले पाहिजे, तरच दयानंदांचे कार्य सफल ठरेल, असेही त्या म्हणाल्या.

प्रो. ओमप्रकाश पाण्डेय यांनी आशीर्वचन दिले. दयानंदांचे उदात्त वैदिक सिद्धान्त तसेच राष्ट्रीय चेतना यावर सर्वच विद्वान विदुषीनी संशोधकांनी शोधवाचनात प्रकट केले. या संगोष्ठीत भारतातील पाचशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे, गुरुकुल, चोटीपुरा येथील ६५ श्रृषिकांनी आपल्या ओजस्वी वाणीने मन्त्रपाठ केले. जेएनयु येथील डॉ. सुधीरकुमार शर्मा - आर्य यांनी या चर्चासत्राचे आयोजन केले होते. प्रवीण के. पियुष यांनी कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.





# लोकप्रशासन विभागात व्याख्यान व चर्चासत्र

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोकप्रशासन आणि स्थानिक स्वराज्य शासन विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विशेष व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन नागपूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक आणि राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विकास जांभूळकर विशेष अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. महिला दिन हा एक दिवस साजरा करण्याची बाब नसून क्षणोक्षणी महिला उन्नतीसाठी विधायक कृती करण्याचा संकल्प आपण यानिमित्त करायला हवा, असे डॉ. जितेंद्र वासनिक यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वाचा उल्लेख करत आपले प्रास्ताविक केले. आंचल गोयल यांनी कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाप्रसंगी केलेल्या उद्बोधनात लोकप्रशासनचा अभ्यास प्रत्यक्षात शासनस्तरावर काम करताना त्यालील आदेशाची एकता आणि प्राधिकारासोबत जबाबदारी या संकल्पनाचा मानव्य विद्याशाखेसोबतचा संबंध अधोरेखित केला. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यातील समन्वय हा सुशासनाला बळ देणारा असतो. ज्याने लोकहित साधले जाते असे त्यांनी पुढे नमूद केले. आपण मूलभूत अधिकारांबाबत बोलण्याआधी आपली मूलभूत कर्तव्ये पार पाडायला हवीत असे दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत महिलांसाठी सुरक्षित आणि सक्षम वातावरण निर्माण करावे, अशी साद उपस्थितांना घातली. महिला दिनानिमित्त महिलांच्या समस्यांना मांडून त्यांच्याबद्दलचा दुजाभाव दुर्दैवाने संपलेला नाही अशी खंत डॉ. विकास जांभूळकर यांनी व्यक्त केली. समभागी वृत्तीची जोपासना आणि अंमलबजावणी हे स्त्री सक्षमीकरणाचे भविष्य आहे, असे आश्वासक प्रतिपादन त्यांनी केले. महिलांची सर्व क्षेत्रात होत असलेली प्रगतीची वाटचाल समृद्ध करण्यासाठी सर्वांनी यथाशक्ती प्रयत्न करायला हवेत असे मत डॉ. शामराव कोरेटी यांनी व्यक्त केले.

चर्चासत्रात कळमेश्वरच्या गटविकास अधिकारी अंशुजा गराटे आणि नागपूरच्या सहाय्यक पोलिस आयुक्त माधुरी बाविस्कर यांनी उपस्थितांसोबत संवाद साधला. स्त्रीने स्वभाव आणि स्वरूप ओळखून सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन स्वावलंबी बनावे हे विचार स्वतःला घडवताना उपयुक्त ठरले असे आपल्या व्यक्तव्यात अंशुजा गराटे यांनी मांडले. पोलीस यंत्रणेत कायदा व सुव्यवस्था राखताना कोणताही दुजाभाव स्त्री म्हणून आमच्यासोबत होत नाही असे मत माधुरी बाविस्कर यांनी आपला सेवाकाळातील अनुभव कथन करताना व्यक्त केले. उपस्थितांच्या विषयानुरूप प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. यानिमित्त डॉ. सुप्रिया डेव्हिड यांनी आपल्या भाषणात महिला अधिकारी प्रशासनकार्यात निश्चित समर्थ आहेत, असे प्रतिपादन केले. संचालन लिंटा टॉमसन आणि वर्षा चौधरी यांनी केले. आभार जूही मिश्रा आणि दीपा बोंबार्डे यांनी मानले. विभागातील शिक्षक अंकुश मराठे यांच्या यशस्वी आयोजनाला संशोधक महेश लाडे शिक्षक रमण शिवणकर, श्रीवर्धन केकतपुरे आणि शिक्षेतर कर्मचारी संदीप बोरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रॉसकंट्री संघाची घोषणा

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अधिपत्याखाली परभणीतील ज्ञानोपासक कॉलेज येथे होणाऱ्या अखिल भारतीय क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाची घोषणा नुकतीच करण्यात आली. १० मार्चपासून होणाऱ्या या स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ स्पर्धेस्थळी पोहचला असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली. विद्यापीठाच्या संघासोबत प्रशिक्षक म्हणून रामचंद्र वाणी आणि प्रणाली घानोडे तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. विबेकानंद सिंग आणि डॉ. भरत मेहता संघासोबत आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे-** सौरव तिवारी (एसबी सिटी कॉलेज), राजन यादव (पीडब्ल्यूएस कॉलेज), रितीक पंचबुद्धे (आयडीसीपीई नागपूर), सागर सिंधपुरे, विकास बिसने (दोन्ही एडी महाविद्यालय, भारसिंगी). राखीव खेळाडू- सनी फुसाटे, भावेश खंडार (दोन्ही एडी महाविद्यालय, भारसिंगी).

**महिला संघ -** रिया दोहतरे (श्री चक्रपाणी महाविद्यालय), तेजस्विनी लांबकाणे (पीजीटीडी शारी. शिक्षण कॉलेज), तृप्ती पटले (रेणुका महाविद्यालय), पुजा पंचबुद्धे (श्री लेमदेव पाटील महाविद्यालय). राखीव खेळाडू- आरती भगत (सीजे पटेल कॉलेज), गितल सोनेकर (धनवटे नॅशनल कॉलेज).

## महिला समाजाचा अभिमान - वंदना खुशालानी

महिला समाजाचा अभिमान आहे. महिला या समाजाच्या कार्याचा आधार आहेत. प्रत्यक्षात स्त्रियाच परिवार समाजाला आत्मीयतेच्या बंधनात बांधते, असे विचार  दयानंद आर्य कन्या महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. वंदना खुशालानी यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, शिक्षण संस्कृती उत्थान न्यास विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागात शनिवार दिनांक ९ मार्च २०२४ रोजी आयोजित जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. खुशलानी बोलत होत्या.





महिलांच्या विविध गुणांचे मार्मिक वर्णन करताना डॉ. खुशलानी पुढे म्हणाल्या की, पुरातन काळात गार्गी, मैत्रेयी, लोकामुद्रा अशा अनेक महान विभुतींनी भारतीय ज्ञान परंपरेला समृद्ध केले. तर महाराणी लक्ष्मीबाई, राणी दुर्गावती, केलदी चन्नम्मा, सावित्रीबाई फुले, शारदा मा, भगिनी निवेदिता अशा तेजस्वी नारी शक्तीचे प्रतीक आहेत. मध्यंतरीच्या काळात विदेशी आक्रमण आणि अत्याचारांमुळे महिलांची सामाजिक स्थिती वाईट होती. मात्र, आधुनिक काळात महिला चेतनेचा विकास झाला आहे. आज नारी शक्ती जागरूक आहे. प्रत्येक क्षेत्रात महिलांनी त्यांचे अस्तित्व सिद्ध केल्याचे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षता करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भारतीय महिलांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात आपली कर्मठता आणि कुशलतेचा परिचय दिल्याचे सांगितले. यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांनी महिला कुटुंबाचे सुरक्षा कवच असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. एकादशी जैतवार यांनी केले. यावेळी डॉ. लखेश्वर चन्द्रवंशी, श्री नरेन्द्र परिहार, डॉ. सुमित सिंह यांच्यासह संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.






## महिलांच्या कार्याचे मोल करावे - कांचन गडकरी

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात

छत्रपती शिवाजी महाराज हे जिजाऊंमुळेच घडले. त्यांच्या संस्कारामुळे महिलांचा सन्मान त्यांच्या मनात कायम राहीला. स्वराज्याच्या लढाईत महिलांनीही हिरारीने सहभाग नोंदविला. तेव्हा महिला सर्व आघाडीवर अतिशय योग्य भूमिका पार पाडत असतात असे प्रतिपादन संस्कार भारतीच्या अध्यक्ष कांचन गडकरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीने गुरूवारी (ता.७) जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित 'महिला सक्षमीकरण आणि संवेदनशीलता' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.

कार्यक्रमात अतिथी म्हणून स्त्रीरोग तज्ञ डॉ. मंगला घिसाड आणि महाविद्यालचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, प्राध्यापिका डॉ. प्रविणा खोब्रागडे आणि डॉ. अधरा देशपांडे उपस्थित होत्या. कांचन गडकरी म्हणाल्या, आजच्या काळात संस्कारी पिढी घडविणे हे मोठे आव्हान आहे. विद्यार्थ्यांमध्ये न्याय आणि समानतेबाबत ज्ञान मिळवायचे असेल तर त्यांनी संत साहित्याचा अभ्यास करावा. आज अनेक घटस्फोटाची प्रकरणे रेंगाळलेली दिसून येतात. त्यामुळे महिलांची वाताहत होते. या प्रकरणांना 'फास्ट ट्रॅक' पद्धतीने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. तुम्ही विद्यार्थी भविष्यातील वकील आणि न्यायाधीश आहात, तेव्हा समाजाच्या उत्थानासाठी कार्य कराल अशी अपेक्षा आहे. संस्कार महत्त्वाचे असून संस्कारी पिढी निर्माण करण्याचे कार्य शिक्षकांनी करावे असे त्या म्हणाल्या.

डॉ. मंगला घिसाड यांनी स्त्रीच्या निरोगी जीवनासाठी आवश्यक असलेल्या स्वच्छताविषयक माहिती दिली. ती गृहीणी म्हणून घरातील सर्व कामे सांभाळते. त्यामुळे तिचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी निरोगी आहाराविषयीही माहिती दिली. प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी महिला लक्ष्मी, दुर्गा आणि सरस्वतीचे स्वरूप आहे. त्यांना सन्मान मिळायला हवा असे सांगीतले. तसेच इन्वेस्ट in वीमेन :एक्सेलरेट प्रोग्रेस असे २०२४ वर्ष यूनाइटेड नेशन्स ने जाहिर केले आहे हे सर्वांन समोर मांडले व आज जागतिक स्तरावर ज्या समस्या आहे त्याचे उत्तर महिला नेतृत्वच सोडवू शकते असे विचार प्रस्तुत केले. प्रास्ताविक डॉ. प्रविणा खोब्रागडे यांनी तर डॉ. चिन्मयी निमखेडकर आणि रोहिणी कारिया यांनी सूत्रसंचालन केले तर आभार डॉ. अधरा देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक समन्वयक डॉ. अधरा देशपांडे, प्रा. ममता गोमासे आणि डॉ. प्रविणा उराडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



## तेजस्विनी लांबकाने सहाव्या स्थानी
### अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने रविवारी घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेत महिलांच्या गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या तेजस्विनी लांबकाने हिने सहावे स्थान प्राप्त केले. तर महिला गटातील सर्वसाधारण विजेतेपदच्या शर्यतीत देखील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सहावे स्थान प्राप्त केले आहे.

परभणी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात परिसरात झालेली महिलांच्या १० हजार किलोमीटर अंतराच्या शर्यतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तेजस्विनी लांबकानेने ३९ मि. ५५ सेकंद अशी वेळ नोंदवित सहावे स्थान मिळविले. प्रथम स्थान गुरुनानक देव विद्यापीठाच्या श्रेयाने तर दुसरे स्थान डीडीयू गोरखपूरच्या रंजना राजपुतने आणि तिसरे स्थान शिवाजी विद्यापीठाच्या रेश्मा केवटेने प्राप्त केले. याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रिया दोहतरेने २९ वे, पुजा पंचबुद्धेने ३३ वे, तृप्ती पटलेने ७५ वे स्थान प्राप्त केले. तेजस्विनी ही पीजीटीडी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची विद्यार्थीनी असून गौरव मिरासे यांच्या मार्गदर्शनात नियमित सराव करते. तर रिया दोहतरे श्री चक्रपाणी महाविद्यालय, पुजा पंचबुद्धे श्री लेमदेव पाटील महाविद्यालय व तृप्ती पटले रेणुका महाविद्यालयाची खेळाडू आहे.

महिला गटात सर्वसाधारण चॅम्पियनशीप प्रकारात १४३ गुणांसह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तिसऱ्या स्थानी राहिला. तर पुरुष गटात टीम चॅम्पियनशिप मध्ये २० वे स्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मिळविले. याशिवाय पुरुषांच्या १० हजार किमी धावण्यात विद्यापीठाचा सौरव तिवारी १७ व्या, राजन यादव ७३, विकास बिसने १५६ आणि सागर सिंदपुरे २२९ व्या स्थानी राहिला. सौरव तिवारी एसबीसीटी महाविद्यालयाचा, सागर सिंदपुरे व विकास बिसने एडी महाविद्यालय भारसिंगीचे विद्यार्थी आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे.




## हरप्रीत रंधावाची हँडबॉल भारतीय संघात निवड
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला मिळाला बहुमान
### कुटुंबातील खेळाच्या यशाची परंपरा राखली कायम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा हँडबॉल खेळाडू असलेला हरप्रीत रंधावा याची भारतीय संघात निवड झाली आहे. अँन्टेक्युएरा स्पेन येथे २६ ते ३० जून २०२४ दरम्यान जागतिक विद्यापीठ स्पर्धेत हरप्रीत रंधावा भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. हरप्रीतची भारतीय संघात निवड झाल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला मोठा बहुमान प्राप्त झाला आहे. शिवाय कुटुंबातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळण्याची परंपरा देखील त्याने कायम राखली आहे.

हरप्रीत रंधावा हा स्थानिक रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील कम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमाच्या आठव्या सत्रातील विद्यार्थी आहे. आंतरराष्ट्रीय हँडबॉलपटू इंद्रजीतसिंह रंधावा आणि डॉ. लवलीतकौर रंधावा यांचा हरप्रीत मुलगा आहे. आई लवलीतकौर रंधावा यांनी १९८४ मध्ये चीन येथे संपन्न झालेल्या आशियाई हँडबॉल स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले होते. महाराष्ट्र सरकारने त्यांचा १९८८ मध्ये 'शिवछत्रपती पुरस्कार' देऊन गौरव केला

वडील इंद्रजीतसिंह रंधावा यांनी एकूण १८ आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताचे प्रतिनिधित्व केले. यात कनिष्ठ व वरिष्ठ गटाच्या आशियाई हँडबॉल स्पर्धेचा समावेश आहे. भारतीय खेळ प्राधिकरणाचे एनआयएस प्रशिक्षक असलेले श्री इंद्रजीत सिंह रंधावा यांना महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये शिवछत्रपती पुरस्कार देत तर १९९६ मध्ये बिहार राज्य सरकारने सर्वोत्कृष्ट हँडबॉल खेळाडू म्हणून त्यांना गौरवान्वित केले आहे. १९९२ मधील सातव्या राष्ट्रकुल हँडबॉल स्पर्धेत हरप्रीतसिंहच्या आई आणि वडिलांचा समावेश असलेल्या अनुक्रमे महिला व पुरुषांच्या भारतीय संघाने रौप्यपदक पटकाविले होते हे विशेष. हरप्रीतचा मोठा भाऊ मेजर मनप्रीतसिंह रंधावा याने सुद्धा २०२१ मध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व आशियाई हँडबॉल स्पर्धेत केले आहे. भारतीय संघाचा कर्णधार होण्याचा मान त्यांना त्यावेळी प्राप्त झाला होता.

केरळ येथील महात्मा गांधी विद्यापीठ कोट्टायम येथे २७ आणि २८ जानेवारी २०२४ या कालावधीत संपन्न झालेल्या निवड चाचणीतून भारतीय संघाची निवड करण्यात आली. हरप्रीतसिंह यांच्या निवडीबाबत विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी आणि रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन उंटवाले यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



# विद्यापीठाचा ६०५ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## डॉ. पांडुरंग एस. डांगे यांच्याकडून अधिसभेत अर्थसंकल्पीय निवेदन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा एकूण ६०५ कोटी १६ हजार रुपयांचा अर्थसंकल्प अधिसभेत सोमवार, दिनांक ११ मार्च २०२४ रोजी सादर करण्यात आला. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पांडुरंग एस. डांगे यांच्याकडून अधिसभेत अर्थसंकल्पीय निवेदन करण्यात आले. विविध तरतूद, दुरुस्तीवर झालेल्या चर्चेनंतर अधिसभा सदस्यांनी अर्थसंकल्पास मंजुरी दिली.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली तर प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या उपस्थितीत अधिसभा पार पडली. वित्तीय वर्ष २०२४-२०२५ चा मूळ अर्थसंकल्प भाग १, २ व भाग ३ मिळून एकूण आगम ५५९ कोटी ३५ लाख ६१ हजार रुपये दर्शविण्यात आला तसेच एकूण खर्च ६०५ कोटी १६ हजार रुपये दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे २०२४-२५ च्या मूळ अंदाजातील एकूण ४५ कोटी ६४ लाख ५५ हजार रुपयांची तूट अपेक्षित आहे. ही तूट काटकसरीच्या उपाययोजना करून कमीत कमी करण्याचा प्रयत्न केल्या जाणार असल्याचे निवेदन यावेळी करण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण होत असताना विद्यापीठाने संशोधन कार्यावर भर देणे गरजेचे आहे. तसेच विद्यार्थी केंद्रित शिक्षण असा या धोरणाचा मूळ मंत्र आहे. या दोन गोष्टी लक्षात घेऊन या अर्थसंकल्पात संशोधन, विद्यापीठ विद्यार्थी विकास योजना तसेच विद्यार्थी सहाय्य योजना याकरिता भरीव तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षात करण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे. या अनुषंगाने विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक तसेच प्रशासकीय प्रणालीमध्ये संरचनात्मक सुधारणा घडवून आणणे क्रमप्राप्त आहे. त्यासंदर्भात विद्यापीठाच्या वित्तीय बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. बहुप्रतिक्षित असलेल्या दुबारनोंद लेखांकन पद्धतीची अंमलबजावणी विद्यापीठाने २०२२-२३ या वित्तीय वर्षापासून सुरू केली आहे हे येथे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते. या पद्धतीची सुधारणा करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे महाराष्ट्रातील दुसरे विद्यापीठ आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख येथे डॉ. डांगे यांनी केला.

## २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

१) विद्यापीठाचा नॅक 'अ' दर्जा कायम ठेवून त्यात आणखी भर घालण्याच्या दृष्टीने विद्यापीठात उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले जात आहे. उत्पन्न आणि वाढता खर्च यांची सांगड घालत विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि समाज यांच्या शैक्षणिक व सामाजिक गरजा लक्षात घेत विद्यापीठाच्या मर्यादित साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करून उच्च शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट सोयी आणि सवलती उपलब्ध करून देणे या अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश आहे.

२) वित्तीय वर्ष २०२४-२०२५ चा मूळ अर्थसंकल्प भाग १, २ व भाग ३ मिळून एकूण आगम ५५९ कोटी ३५ लाख ६१ हजार रुपये दर्शविण्यात आला तसेच एकूण खर्च ६०५ कोटी १६ हजार रुपये दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे २०२४-२०२५ च्या मूळ अंदाजातील एकूण ४५ कोटी

६४ लाख ५५ हजारांची तूट दर्शविण्यात आली आहे.

३) इमारत बांधकामांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाकरिता २ कोटी रुपये, ज्ञानस्त्रोत केंद्राकरिता १.१० कोटी रुपये, शारीरिक शिक्षण विभागाकरिता १ कोटी रुपये, औषधी विज्ञानशास्त्र विभागाकरिता ७५ लाख रुपये, शताब्दी देणग्यातून बांधकामा करिता १५ कोटी रुपये, इनडोअर स्टेडियम करिता ३० लाख रुपये, विद्यापीठाच्या विविध परिसराकरिता ७ कोटी रुपये, नवीन प्रशासकीय इमारतीतील उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

४) विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग, वसतिगृहे, ग्रंथालय व स्वच्छतागृहे इत्यादी इमारतीच्या दुरुस्ती व देखभालीकरिता रु. १० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

५) परीक्षा विभाग हा नेहमीच आपणा सर्वांचा जिव्हाळ्याचा पण तेवढाच संवेदनशील विभाग आहे. परीक्षेच्या कामकाजातील मानवी हस्तक्षेप कमीतकमी करण्याकरिता परीक्षा विभागाचे संगणकीकरण हा त्यावर उपाय आहे. त्यामुळे परीक्षेपोटी प्राप्त होणाऱ्या एकूण आगमापैकी ८० टक्के उत्पन्न परीक्षा विभागावर खर्च करण्याची तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर परीक्षा विभागाचे संगणकीकरण, परीक्षा सुधार व इतर आवश्यक उपस्कर / उपकरण खरेदी करण्याकरिता एकूण १३ कोटी रुपयांची भरघोस तरतूद सदर अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

६) विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे असे शब्दशः आपण नेहमीच म्हणत असतो. त्याविषयी विद्यार्थ्यांचे या सदनातील सन्माननीय प्रतिनिधी आवर्जून विद्यार्थ्यांच्या हिताच्या बाबतीत अधिसभेत चर्चेत हिरिरीने भाग घेतात. विद्यार्थी हिताच्या, कल्याणाच्या विविध योजना हे तरुण नेतृत्व सदनामध्ये प्रभावीपणे मांडतात. त्यांना मूर्त स्वरूप देणे ही तेवढेच अगत्याचे ठरते. विद्यापीठात विविध प्रकाराच्या जसे की, ग्रंथालय, प्रयोगशाळा, वर्गखोल्या, उपस्कर, क्रीडांगणे इत्यादींची केवळ निर्मिती करून चालणार नाही तर त्यांचा महत्तम उपयोग झाला पाहिजे आणि उपयोग करून घेण्याकरिता मनुष्यबळाची तेवढीच नितांत आवश्यकता असते. शिक्षकांच्या नवीन नियुक्त्या अद्यापही न झाल्यामुळे सर्व सुविधा उपलब्ध करून देऊनही हया सुविधांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याकरिता पुरेपूर उपयोग होऊ शकत नाही. अशारितीने विद्यापीठातील शिक्षकांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कंत्राटी शिक्षकांच्या वेतनाकरिता रु. ३.५५ कोटी व घड्याळी तासिकावरील शिक्षकांच्या वेतनाकरिता रु. ९.६८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

७) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आपल्या विद्यापीठाने कटाक्षाने लक्ष दिलेले आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीकरिता रु. १ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थी कल्याण निधी अंतर्गत येणाऱ्या योजनांचा खर्च, विद्यापीठातर्फे चालविण्यात येणारे कोचिंग क्लासेस, आर्थिक दुर्बल होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्याकरिता व इतर आकस्मिक योजना याकरिता रु. ६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थी सल्ला व सुविधा केंद्राकरिता रु. १० लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांकरिता विविध योजनेअंतर्गत (विद्यार्थी सहाय, वैद्यकीय मदत आणि कल्याण निधी) करिता रु. १.९६ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

८) कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून विविध कौशल्य पाठ्यक्रम राबविण्याकरिता रु. २ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय समुपदेशनकरिता योग्य तरतूद करण्यात आलेली आहे. आपणास कळविण्यात आम्हाला आनंद होत आहे की विद्यापीठाला महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास अंतर्गत अनु. ज./ अनु. जा विद्यार्थ्यांकरिता रु. १ कोटीचा कायदिश प्राप्त झाला आहे. तसेच संलग्नित महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकन एंव प्रत्यायनकरिता परीस्पर्श योजनेअंतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

९) रूसा सेंटर फॉर बायोॲक्टीव्ह ॲण्ड नॅचरल प्रॉडक्ट केंद्र उभारले असून या केंद्रासाठी रु. १.७५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन व नेटसंबंधी सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने बहुविध सोई-सुविधासंबंधी सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मल्टीफसीलिटी सेंटरकरिता रु. ५.३० लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

१०) विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना संशोधन प्रकल्प राबविण्याकरिता रु. २.३५ कोटी ची तरतूद तसेच विद्यापीठाव्दारे आयोजित राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परीषदा/कार्यशाळा व वार्षिक अंशदान याकरिता रु. ३० लाखांची तरतूद केलेली आहे.

११) शताब्दी महोत्सवाकरिता आवर्ती खर्चाकरिता रु. १५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

१२) २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात जरी रु. ४५.६४ कोटींची तूट दिसत असली तरी येणाऱ्या आर्थिक वर्षात सदर तूट कमी करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील. त्याकरिता प्रामुख्याने होणारा अंशकालीन व कंत्राटी शिक्षकांच्या वेतनावरील खर्च वाचविण्याकरिता विद्यापीठात शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येतील तसेच वीज आकारावर जास्त खर्च होत असल्याचे निदर्शनास आल्याने सोलर एनर्जी उपकरण बसविण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

१३) परीक्षेच्या कामात कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण येऊन परीक्षेच्या कामाला विलंब होऊ नये याकरिता परीक्षा विभागात सर्व व्यय शीर्ष निहाय पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे.

१४) सी. एस. आर. योजनेअंतर्गत विद्यापीठाला जास्तीत जास्त देणगी प्राप्त करता येईल याबाबत विद्यापीठ प्रयत्नशील राहील. विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांकडून देणगी स्वरूपात रक्कम प्राप्त करण्याबाबत योजना राबविण्यात येईल तसेच शासनाकडून विविध योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करेल.

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेतील चर्चेत सदस्यांनी सहभागी होत दुरुस्त्या सुचविल्या.

# संविधान प्रास्ताविका पार्ककरीता ५० लाखांचा निधी वितरित प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांची माहिती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या प्रांगणात निर्माणाधीन असलेल्या संविधान प्रास्ताविका पार्कच्या विद्यापीठाकडून करावयाच्या मुख्य प्रवेशद्वार व सुरक्षा भिंतीच्या कामाकरिता प्रथम टप्पा म्हणून ५० लाख रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला वितरित करण्यात आला आहे. तसेच ३ महिन्यात संविधान प्रास्ताविका पार्कचे काम पूर्ण करण्याच्या सूचना माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी दिल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या प्रांगणात संविधान प्रस्ताविका पार्क निर्माणाधिन आहे. या पार्कचे बहुतांश काम पूर्णत्वास आले आहे. उर्वरित कामे तातडीने पूर्ण व्हावीत म्हणून विद्यापीठाने सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या १.९८ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच प्रथम टप्पा म्हणून ५० लाख रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरित केला आहे. उर्वरित १.४८ कोटी रुपयांचा निधी लवकरच सार्वजनिक बांधकाम विभागाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर देण्यात येणार आहे. संविधान प्रास्ताविका पार्क मधील मुख्य प्रवेशद्वार तसेच सुरक्षा भिंतीचे काम विद्यापीठामार्फत केले जात आहे. या कामाकरिता विद्यापीठाकडून हा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्याची माहिती माननीय प्रभारी कुलगुरूंनी दिली.







# क्षेत्र प्रकल्पाबाबत समाजशास्त्र विभागात कार्यशाळा

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व जे. एम. पटेल कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाचे आयोजन

क्षेत्र प्रकल्प विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात एक दिवशीय कार्यशाळा शनिवार, दिनांक ९ मार्च २०२४ रोजी आयोजित करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग आणि भंडारा येथील जे एम पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर, डॉ. प्रदीप मेश्राम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी समाजशास्त्राचा अभ्यास करताना क्षेत्र प्रकल्पाला अत्यंत महत्त्व असल्याचे सांगितले. नवीन शैक्षणिक धोरण (NEP ) लागू करण्यात आल्यानंतर यानुसार विद्यापीठाने अभ्यासक्रम तयार केला आहे. समाजशास्त्र हा समाजाचा घटक आहे व सामाजिक क्षेत्र प्रत्यक्ष समजून घेण्याकरिता क्षेत्र प्रकल्प महत्त्वपूर्ण असल्याचे प्र-कलगुरूंनी सांगितले.

एम.ए. समाजशास्त्रच्या द्वितीय सत्राला अनिवार्य विषय 'क्षेत्र प्रकल्प' नव्याने समाविष्ट करण्यात आला. याबाबत प्रमुख वक्ता म्हणून डॉ. प्रदीप मेश्राम यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची क्षेत्र भेटीने समाज व त्यातील समस्या जवळून अनुभवता येईल. शोधक वृत्तीला चालना देण्याकरिता आणि कौशल्यविकास करण्याकरिता या विषयाचे महत्व डॉ. मेश्राम यांनी विशद केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. नितीन कायरकर यांनी केले तर आभार डॉ. विजयकुमार यांनी मानले. कार्यशाळेला विद्यापीठातील सलंग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांची जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे पाचवे उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भावनातील सभागृहात मंगळवार, दिनांक १२ मार्च २०२४ रोजी शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव सर्वश्री गणेश कुमकुमवार, युडीसी शैलेश राठोड, रुपेश आतराम, अनिल खरे, कवडू भोयर, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, प्रकाश कुंजाम, आसिफ शेख यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.




## सामाजिक बदलातून बघावा महिलांचा सर्वांगीण विकास श्रीमती शुभदा देशमुख यांचे प्रतिपादन

### विद्यापीठ राज्यशास्त्र विभागात महिला दिवस कार्यक्रम

केवळ आर्थिक निकषावर नव्हे तर सामाजिक बदलातून महिलांचा सर्वांगीण विकासाकडे बघावे असे प्रतिपादन श्रीमती शुभदा देशमुख यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात महिला दिनानिमित्त 'महिलांच्या आरोग्याचे प्रश्न आणि त्यांचे आरोग्य' या विषयांवर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती देशमुख मार्गदर्शन करीत होत्या.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्यशात्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती शुभदा देशमुख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात पुढे बोलताना श्रीमती देशमुख यांनी महिला ज्या परिस्थितीत काम करतात ते त्यांचा जीवनातील एक महत्वपूर्ण भाग झाले आहे. परंतु हे केवळ महिलांच्या जीवनात यावा हे अयोग्य वाटत असल्याचे सांगितले. किशोरवयीन मुलींचे आणि मुलांचे प्रश्न हे वेगळे आहेत. पण यात मुलींना जास्त प्रश्नांना तोंड द्यावे लागते. मुलींच्या आरोग्य विषयक अनेक समस्या आहेत. परंतू त्या समाजासमोर मांडल्या जात नाही. विद्यापीठात किशोरवयीन मुलांना लैंगिक शिक्षण यावर जागृती होणे गरजेचे आहे. ज्यामुळे नवीन पिढीला माहिती होईल व आरोग्य काळजी घेतली जाईल. स्त्री- पुरुष समानतेचा विचार बाहेर नाहीत तो देशपातळीवर प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे, असे श्रीमती देशमुख म्हणाल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि राज्यशात्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांनी अध्यक्षीय भाषणातून विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विभागातील प्रा. प्राची वासनिक व प्रा. प्रियंका गावडे यांनी सुध्दा महिला दिनानिमित्त आपले विचार प्रकट केले. संचालन प्रा. किशोर नैताम यांनी केले तर आभार प्रा. रायन महाजन यांनी मानले. या कार्यक्रमाला विभागातील सर्व प्राध्यापक गण व विद्यार्थी उपस्थित होते.




# विद्यार्थी जीवनात वैयक्तिक गुणांचे संगोपन महत्त्वाचे

## राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांचे प्रतिपादन

विद्यार्थी जीवनात शिक्षणासोबतच खेळांचे व वैयक्तिक गुणांचे संगोपन महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात 'अंतराग्नी' या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन बुधवार दिनांक ६ मार्च ते ९ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमात डॉ. जांभुळकर मार्गदर्शन करीत होते. या महोत्सवाचे उद्घाटन मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.शामराव कोरेटी यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते.

खेळ हा मानवी जीवनाचा अभिभाज्य भाग असल्याचे सांगत जीवनाच्या सर्व क्षेत्रात खेळाला जास्त महत्त्व आहे असे डॉ. जांभुळकर पुढे बोलताना म्हणाले. त्यातून माणसाचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्व घडविण्यास मदत होते, असे ते म्हणाले. या चार दिवसीय महोत्सवात विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये क्रिकेट, समुह नृत्य, ऐकल नृत्य,संगीत खुर्ची, रस्सीखेच, एकांकिका, रांगोळी स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. समारोपीय कार्यक्रमात सत्र २०२२-२३ सुवर्ण पदक विजेती नेहा कापगते , विभागातील नेट, सेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व विविध स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन डॉ. विकास जांभूळकर व विभागातील इतर प्राध्यापक यांच्या हस्ते गौरव करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक प्रा. किशोर नैताम यांनी केलें. संचालन सिमरन थूल आणि सिरत शेख यांनी केले तर आभार शशांक दुर्गे यांनी मानले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. प्राची वासनिक, प्रा. प्रियंका गावडे, विद्यार्थी प्रतिनिधी सुनीता मोन्देकर , प्रा. प्रमोद काणेकर, प्रा. रायन महाजन, प्रा. अभिषेक चिमनकर, प्रा. किशोर पाटील, प्रा.सुनील अखंडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कराटे संघाची घोषणा

## अ. भा. आंतरविद्यापीठ कराटे स्पर्धा



चंदीगड येथील पंजाब विद्यापीठाच्या यजमानपदाखाली १६ मार्चपासून सुरु होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कराटे स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली आहे.

कराटेच्या महिला व पुरुष अशा विविध प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे खेळाडू सहभागी होणार आहे. विद्यापीठाचा संघ- पुरुष (वैयक्तिक कुमिते- मानस राउत- रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, हितिक मुदलियार- धनवटे नॅशनल कॉलेज). वैयक्तिक काता-(मानस राउत- जीएच रायसोनी कॉलेज). काता पुरुष- सांघिक-(यश निनावे- मोहता सायंस विद्यालय, ऋषिकेश बागडे-जीएच रायसोनी अभियांत्रिकी कॉलेज, सुयश पाणबुडे- तिरपुडे इन्स्टिट्यूट). प्रशिक्षक- इमॅन्युएल फिलिप, संघ व्यवस्थापक डॉ. झाकीर खान.

महिला- वैयक्तिक कुमिते-(जान्हवी टिचकुले- कमिन्स अभियांत्रिकी कॉलेज, कनिका शर्मा- रेणुका कॉलेज).

कुमिते- सांघिक-(रिमषा मलिक- संत गाडगेबाबा कॉलेज, भुसावळ), अश्विनी सरोदे(नारायण काकडे स्मृती कॉलेज), करीष्मा मडावी (आरएस मुंडले कॉलेज), सय्यद मेहवीश अली(अंजूमन अभियांत्रिकी कॉलेज) सांघिक काता-(राजश्री माहुले- नागपूर शारी. शिक्षण महाविद्यालय), रुतिका अराईकर(गोविंदराव वंजारी लॉ कॉलेज), अंजल दखणे(डॉ. आंबेडकर कॉलेज). प्रशिक्षक- सचिन लोहकरे, संघ व्यवस्थापक पंकज खंडागळे.





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाने पटकावला पथनाट्य स्पर्धेचा प्रथम पुरस्कार

## राष्ट्राच्या विकासासाठी सजगतेने द्यावे योगदान - प्रकाश महाराज वाघ

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची पथनाट्य स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या पथनाट्य स्पर्धेचा प्रथम पुरस्कार नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाने पटकावला. महात्मा गांधी विचारधारा विभाग येथे शनिवार, दिनांक ९ मार्च २०२४ रोजी पार पडलेल्या अंतिम फेरीनंतर पुरस्कार वितरण करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील केंद्रीय प्रचार सेवाधिकारी हभप प्रकाश महाराज वाघ यांनी मार्गदर्शन करताना युवकांनी सजग राहून राष्ट्राच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले.

विद्यापीठाचा महात्मा गांधी विचारधारा विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरनगर येथील महात्मा गांधी विचारधारा विभाग येथे आयोजित पथनाट्य स्पर्धेच्या पुरस्कार वितरण समारंभाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनात प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील केंद्रीय प्रचार सेवाधिकारी हभप प्रकाश महाराज वाघ, नागपूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे सचिव श्री रवी गुडदे, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची उपस्थिती होती. 'महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामोद्धाराची कल्पना व आजचा युवक' विषयावर आयोजित पथनाट्य स्पर्धेत १० हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे स्वरूप असलेला प्रथम पुरस्कार विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाने, ७ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार गोंदिया येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयाने, ५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार वर्धा येथील कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्कने पटकावला. प्रत्येकी ३ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असा प्रोत्साहनपर पुरस्कार भंडारा येथील जे. एम. पटेल कॉलेज व वाडी येथील जवाहरलाल कला वाणिज्य महाविद्यालयाने प्राप्त केला.

अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने राष्ट्रसंतांची विचार नागरिकांपर्यंत पोहोचावे म्हणून या पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगितले. समाज प्रबोधनाचे कार्य राष्ट्रसंतांनी त्यांचे साहित्य व भजनातून केले. समाज प्रबोधनात्मक भजनातून त्यांनी अंधश्रद्धेवर प्रहार केला. तर महात्मा गांधी यांनी समाजातील शेवटच्या मानसाप्रती विचार करणारे तत्वज्ञान अंगीकारले होते, असे ते म्हणाले. पथनाट्याच्या अंतिम फेरीचे परीक्षण श्री संजय पेंडसे, हर्षद सालपे व नितीन मरसकोल्हे यांनी केले. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी केले. संचलन प्रा. देवमन कामडी यांनी केले तर आभार प्रा. डी.एस. वैद्य यांनी मानले.

## पथनाट्य स्पर्धेत एकूण ४२ पथनाट्यांचा सहभाग

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठ स्तरीय पथनाट्य स्पर्धेत चारही जिल्ह्यातून एकूण ४२ पथकांनी सहभाग घेतला. नागपूर जिल्ह्यासाठी गांधी विचारधारा विभाग येथे दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्राथमिक फेरी झाली. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील १२ पथकांनी सहभाग घेतला. प्राथमिक फेरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाने प्रथम, जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने द्वितीय तर नवप्रतिभा वरिष्ठ महाविद्यालय नागपूरने तृतीय क्रमांक प्राप्त केला होता. वर्धा जिल्ह्यासाठी लोक महाविद्यालय वर्धा येथे १ मार्च २०२४ रोजी प्राथमिक फेरी झाली. यात एकूण ११ संघांनी सहभाग घेतला तर कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धाने प्रथम, बजाज कॉलेज ऑफ सायन्स वर्धाने द्वितीय तर लोक महाविद्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला होता.

भंडारा जिल्ह्यासाठी जे. एम पटेल कॉलेज येथे ५ मार्च २०२४ रोजी प्राथमिक फेरी झाली. यात एकूण १४ संघ सहभागी झाले. जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भंडाराने प्रथम, प्रगती महिला कला महाविद्यालयाने द्वितीय तर कला व वाणिज्य महाविद्यालय जवाहर नगरने तृतीय क्रमांक प्राप्त केला होता. गोंदिया जिल्ह्यासाठी पुंजाभाई पटेल कॉलेज गोंदिया येथे ७ मार्च रोजी प्राथमिक फेरी झाली. यात ५ संघांनी सहभाग घेतला तर लक्ष्मणराव मानकर शिक्षण महाविद्यालय खामगावने प्रथम, एन.एम.डी. महाविद्यालय गोंदियाने द्वितीय तर पुंजाबाई पटेल शिक्षण महाविद्यालय गोंदियाने तृतीय क्रमांक प्राप्त केला होता. या सर्व जिल्ह्यातून प्रत्येकी तीन सर्वोत्तम पथक याप्रमाणे एकूण १२ पथनाट्य पथक अंतिम फेरी सहभागी झाले होते. पथनाट्य स्पर्धेच्या यशस्वितेसाठी वर्धा जिल्ह्यातील लोक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजीव जाधव तसेच समन्वयक डॉ. प्रशांत ढवळे, डॉ. सोनाली बनसोड , भंडारा जिल्ह्यातील जे. एम. पटेल कॉलेज चे प्राचार्य डॉ. विलास ढोमणे व समन्वयक डॉ. अपर्णा यादव, डॉ. श्रीरामे , गोंदिया जिल्ह्यातील पुंजाबाई पटेल शिक्षण महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर. एल. निकोसे व समन्वयक डॉ. सुरेश पाटील त्याचप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी अध्यासनाच्या समन्वयक छाया खोब्रागडे यांनी सहकार्य केले.





## विद्यापीठाच्या महिला वसतीगृहात सिकलसेल तपासणी

### शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला वसतिगृहात सिकलसेल तपासणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर व जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, महिला वसतिगृहाच्या वरिष्ठ अधीक्षिका डॉ. रिता वडेटवार, महिला वैद्यकिय अधिकारी डॉ. सरोज श्यामकुवर, अधीक्षिका सरोज लांजेवार यांची उपस्थिती होती. महाविद्यालयीन विद्यार्थीनींची सिकलसेल तपासणी कार्यक्रम संबधी जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे समन्वयक विपूल व त्यांच्या चमूने विद्यार्थिनींची तपासणी  सिकलसेल तपासणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला वसतीगृहाच्या वरिष्ठ अधिक्षिका डॉ. रिता वडेटवार यांनी केले. प्रमुख पाहुणे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी सिकलसेल संदर्भात मुलींना मार्गदर्शन केले. सिकलसेल जेव्हा एखाद्या व्यक्तीला पालकाकडून हिमोग्लोबिन S जनुक आणि सामान्य हिमोग्लोबिन जनुक हिमोग्लोबिन A दुसऱ्या वारसाने मिळतो. ते हिमोग्लोबिन S जनुकाचे वाहक आहेत आणि त्यांना मूल झाल्यावर ते पुढे जाऊ शकतात. त्यामुळे सिकलसेलची तपासणी करून घेणे व सिकलसेल असल्यास त्यावर त्वरित निदान करणे फार गरजेचे आहे, असे वैद्यकिय चमुद्वारे मुलींना सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वसतीगृहाची विद्यार्थिनी कु. जान्हवी मंजुळे हिने केले. त्यानंतर मुलींची सिकलसेल तपासणी केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा विजय

### महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू टी- २० क्रिकेट स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने ८ विकेट्स राखत विजय प्राप्त केला आहे. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू टी -२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संघाचा पराभव केला आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संघाने प्रथम फलंदाजी करीत १८.१ षटकात सर्व बाद ८६ धावा काढल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने केवळ १०.५ षटकातच दोन विकेट्स देत ८९ धावा काढत विजय प्राप्त केला. विद्यापीठाच्या निनाद राऊत यांनी ४ षटकात १९ धावा देत जळगाव विद्यापीठाचे पाच बळी घेतले. उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने निनाद राऊत यांना सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सलामीचे फलंदाज अक्षय राऊत एक धावा काढत बाद झाले. त्यानंतर निलेश रोकडे यांनी २४ धावा, सुरज सूर्यवंशी यांनी ३३ धावा काढत संघाला विजयाकडे नेले. सुरज सूर्यवंशी ३३ धावा काढत बाद झाल्यानंतर दुर्गेश बैस यांनी १५ धावा काढत संघाला विजय प्राप्त करून दिला. विजयी संघाचे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यापीठाच्या क्रिकेट संघामध्ये दुर्गेश बैस, ईश्वर कुटे, सुरज सूर्यवंशी, रितेश पुरकाम, निलेश रोटके, महेंद्र बनकर, समीर दाणे, रमेश शेवारे, निनाद राऊत, अक्षय राऊत, दीपक घोडमारे, रितेश कांबळे, नितीन खरबडे, स्वप्निल मोडक यांचा खेळाडू म्हणून तर संघ व्यवस्थापक म्हणून श्री. दिनेश दखणे व श्री दर्पण गजभिये यांचा समावेश आहे.




## संशोधक विद्यार्थ्यांसाठी क्षमता निर्माण कार्यशाळा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संशोधक विद्यार्थ्यांसाठी क्षमता निर्माण कार्यशाळा ५ ते ७ मार्च २०२४ दरम्यान गणित विभागातील रामानुजन सभागृह येथे पार पडली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, ब्रिटिश कौन्सिल, भारत सरकारचा विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, आयआयएसइआर पुणे, रॉयल सोसायटी ऑफ पुणे, टाटा टेक्नॉलॉजीस यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

औद्योगिक, तांत्रिक, सामाजिक आदी विविध विषयांमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये क्षमता निर्माण करणे हा या कार्यशाळेमागील उद्देश होता. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा मध्य प्रदेशातील सतना विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. बी. ए. चोपडे, विद्यापीठाचे मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी आयआयटीएम मुंबई येथील प्राध्यापक तसेच क्युमिन्स इंडिया लिमिटेडच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. अनुराधा गणेश यांनी विद्यार्थ्यांना क्षमता निर्माण विषयक महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या. संशोधनात्मक शिक्षण झाल्यानंतर उद्योग निर्मिती कशाप्रकारे करता येईल. सोबतच उद्योग निर्मितीत नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असलेली वैशिष्ट्ये याविषयी डॉ. अनुराधा गणेश यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वेलनोवेट बायोसोल्युशनचे सीईओ डॉ. मिलिंद चौधरी यांनी स्टार्टअप कशाप्रकारे सुरू करावे. आपल्या कल्पनेतून स्टार्टअप करता येते. याकरिता स्टार्टअप आणि उत्पादन विकास कशाप्रकारे केले पाहिजे, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. मुक्त संपादक तथा संवाद कौशल्य मार्गदर्शक अनिता नागराज यांनी संशोधन आणि शिक्षणात प्रभावी संवाद महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. याबाबत त्यांनी कार्यशाळेत सादरीकरणातून विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले. प्रभावी प्रेझेंटेशन डिझाईन आणि तयार करण्याचा मुख्य पायऱ्या त्यांनी सांगितल्या. स्वतःची संवाद कौशल्य विकसित करीत वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षमतांना बळकटी देता येत असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन उद्योग स्थापन करताना शैक्षणिक कौशल्याचे बौद्धिक संपत्ती ओळखत पेटंट, कॉपीराईट च्या माध्यमातून स्वरक्षण धोरण तयार करणे आदी विषयावर इंटरॅक्चुअल प्रॉपर्टी ग्रुप सीएसआयआर मधील वरिष्ठ प्रधान शास्त्रज्ञ डॉ. नितीन शुक्ला यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत १५० पेक्षा अधिक संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेत सहभागी सर्व संशोधक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.




# चरित्र व्यक्तिमत्त्वाचे मापदंड - डॉ. प्रकाश इटनकर

## हिंदी विभागात व्यक्तिमत्व विकास आणि चरित्र निर्माण विषयावर कार्यशाळा

मनुष्याचा वास्तविक विकास त्याचे व्यक्तिमत्व आणि चरित्राच्या आधारावर होतो. त्यामुळे चरित्र हेच व्यक्तिमत्त्वाचे मापदंड असल्याचे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे सहअधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर हिंदी विभाग व शिक्षण संस्कृती उत्थान न्यास विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यक्तिमत्व विकास आणि चरित्र निर्माण' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. इटनकर मार्गदर्शन करीत होते. व्यक्तिमत्व हे मनुष्याचा आंतरिक पक्ष आहे. त्यामुळे त्याला जीवनाचे संगीत देखील म्हटल्या जाते, असे डॉ. इटनकर पुढे बोलताना म्हणाले. पर्यावरण तज्ञ डॉ. कौस्तुभ चटर्जी यांनी निसर्गाचा प्रत्येक भाग आपल्याला सहजीवनासाठी प्रेरित करतो, असे मार्गदर्शन करताना सांगितले. मनुष्यामध्ये अनंत शक्ती असून त्याचा उपयोग प्रकृतीच्या कल्याणाकरिता करावा, असे ते म्हणाले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे हे मार्गदर्शन करताना संकटांचा सामना करताना व्यक्तीच्या क्षमतेची पारख होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते असे म्हणाले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात चरित्र निर्माण आणि व्यक्तिमत्व विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. रामकृष्ण मठ येथील स्वामी ज्ञानगम्यानंद यांनी पवित्रता व साहस याला चरित्र निर्माणाचे निकष असल्याचे सांगितले. सद्‌चिंतन और सद्‌कृती यातून चरित्र निर्माण होते. चरित्र हे यशाचे गमक असून चरित्र माणसाला महान बनवीत असल्याचे ते म्हणाले.

व्यक्तिमत्व विकासामध्ये भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. अमृता इंदूरकर यांनी व्यक्तिमत्व, चरित्र व भाषा हे तीन मनुष्य जीवनातील अभिन्न अंग असल्याचे सांगितले. व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती भाषेच्या माध्यमातून होत असल्याचे त्या म्हणाल्या. हिंदी विभागातील डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी व्यक्तिमत्व विकासाचे पाच परिणाम सांगितले. यामध्ये शारीरिक विकास, मानसिक विकास, बौद्धिक विकास, भावनात्मक विकास आणि अध्यात्मिक विकासाचा समावेश आहे. समारोपीय कार्यक्रमात नागपूर महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री मनीष सोनी यांनी धैर्य, संयम आणि पवित्रता मानवी जीवनाचे अनिवार्य तत्व असल्याचे सांगितले. हिंदी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांनी जीवनातला श्रेष्ठ बनविण्याकरिता आपणामध्ये दृढनिश्चयाची आवश्यकता असल्याचे सांगितले. दर्शनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम यांनी व्यक्तिमत्व विकासाची आवश्यकता यावर माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुमित सिंह यांनी केले तर आभार डॉ. एकादशी जैतवार यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील प्रा. जागृती सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, आकांक्षा बांगर, विनय उपाध्याय यांच्यासह संशोधक, विद्यार्थी उपस्थित होतो.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष-महिला जिम्नॅस्टिक संघाची घोषणा

### अमृतसर येथे होणाऱ्या अखिल भारतीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत होणार सहभागी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला जिम्नॅस्टिक संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केली आहे. अमृतसर येथे १९ मार्च ते २३ मार्च दरम्यान होणाऱ्या ऑल इंडिया आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक आणि रिदमिक जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिप स्पर्धेत विद्यापीठाचे दोन्ही संघ सहभागी होणार आहे.

आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक पुरुष संघात आर्यन नहाते (कमला नेहरू महाविद्यालय नागपूर), अनिश बेहरे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर), वरुण काळे (धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर), मंथन भलावी (लेट वी. एन. शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर), मन मसराम (कमला नेहरू महाविद्यालय नागपूर) या खेळाडूंचा समावेश आहे. आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक महिला संघात सायली सावरकर (हिस्लाप कॉलेज नागपूर), आयुषी घोडेश्वर (एलएडी अँड एसआरपी वुमन कॉलेज नागपूर), ऋचा सागुलाले (सेंट विसेंट पलोटी इंजिनिअरिंग कॉलेज नागपूर), आदिती चौधरी (ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय) व लक्ष्मी साठवणे (एलएडी अँड एसआरपी वूमन कॉलेज नागपूर) या खेळाडूंचा समावेश आहे. रीथमिक जिम्नॅस्टिक महिला संघात एलएडी अँड एसआरपी वूमन कॉलेज नागपूरच्या लक्ष्मी साठवणे या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली आहे.

संघ प्रशिक्षक म्हणून डॉ. पंकज आर. कुंडे, श्री पुरुषोत्तम धरवनकर तर संघ व्यवस्थापक म्हणून निकिता विष्णोई यांचा समावेश आहे. अमृतसर येथील स्पर्धेकरिता विद्यापीठाचा जिम्नॅस्टिक संघ शनिवार, दिनांक १६ मार्च रोजी रवाना होणार आहे. निवड झालेल्या संघाचे विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा सोमवारपासून

### प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी घेतला उन्हाळी परीक्षेच्या नियोजनाचा आढावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा सोमवार, दिनांक १८ मार्च २०२४ पासून सुरू होत आहे. ५ ते ६ टप्प्यात विविध अभ्यासक्रमांच्या सुमारे ११०० पेक्षा अधिक उन्हाळी परीक्षांचे नियोजन परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे. उन्हाळी २०२४ परीक्षेच्या नियोजनाचा आढावा प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०२४ रोजी आयोजित बैठकीत घेतला.

परीक्षा भवन येथे झालेल्या बैठकीचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, उपकुलसचिव सर्वश्री नवीन मुंगळे, मोतीराम तडस, नितीन कडबे, डी. एस. पवार यांची उपस्थिती होती. उन्हाळी २०२४ परीक्षेकरिता एकूण १३३ परीक्षा केंद्र निर्धारित करण्यात आले आहे. यामध्ये नागपूर शहर ३५, नागपूर ग्रामीण ३६, भंडारा जिल्ह्यात २०, गोंदिया जिल्ह्यात १७ तर वर्धा जिल्ह्यात २५ केंद्र राहणार आहे. प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा सोमवार दिनांक १८ मार्चपासून सुरू होत आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २६ मार्चपासून, पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा ८ एप्रिल तर पुरवणी परीक्षा १५ एप्रिल पासून सुरू होत असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल साबळे यांनी दिली. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा मे च्या अंतिम आठवड्यात पूर्ण करण्याच्या सूचना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी बैठकीत दिल्या. आगामी उन्हाळी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना देण्यात आल्या. परीक्षा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार होऊ देऊ नका. केंद्राधिकारी यांनी याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने केंद्राधिकारी यांनी स्वतः लॉगिन वरून प्रश्नपत्रिका डाऊनलोड करावी. केंद्राधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यास चुका होतात. परीक्षेचे काम हे अत्यंत संवेदनशील असून याला गांभीर्याने घेण्याच्या सूचना डॉ. दुधे यांनी केल्या. सोबतच विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह त्याचप्रमाणे उन्हाळा लक्षात घेता कुलर तसेच पंख्याची व्यवस्था करण्याच्या सूचना डॉ. दुधे यांनी केल्या.

परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी परीक्षेच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण माहिती केंद्राधिकाऱ्यांना दिली. सोबतच परीक्षेच्या वेळेबाबत मार्गदर्शन केले. उपकुलसचिव श्री मोतीराम तडस यांनी ऑनलाइन परीक्षेच्या कामकाजाबाबत उपस्थित त्यांना माहिती दिली. आढावा बैठकीला विद्यापीठ परीक्षेत्रातील ४ ही जिल्ह्यातील प्राचार्य व केंद्राधिकारी यांची उपस्थिती होती.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सेपकटाकरा संघाची घोषणा

कुरनुल येथील रायलसीमा विद्यापीठाच्या अधिपत्याखाली १७ ते २० मार्च दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय सेपकटाकरा स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाची घोषणा करण्यात आली आहे. विद्यापीठाचा हा संघ स्पर्धेसाठी रवाना झाला असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे- लेहांशू लाडके, सौरभ कोसुळकर, ओम मुळे (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायंस कॉलेज, वर्धा), अनिकेत काळे (शांतीनिकेत बिझनेस स्कूल नागपूर), शाह तनवीर (रेणुका महाविद्यालय), फैजान शेख (धनवटे नॅशनल कॉलेज), निलेश पाचे, गौरव मिसार (एमबी पटेल कॉलेज सालेकसा), मो. अली, शहनावाज खान (नागपूर शारी. शिक्षण महा. नागपूर), कुणाल इवनाते (यशवंत महाविद्यालय वर्धा), कमरान अंसारी (हिस्लॉप कॉलेज), आदित्य नागतोडे (जगत आर्ट्स कॉलेज, गोरेगाव). राखीव खेळाडू- रितेश बिल्लोरे(एमबी पटेल कॉलेज, सालेकसा), हुझैफुद्दीन क्वाझी (यशवंत महाविद्यालय, वर्धा), अबुझर बागवन (रामकृष्ण वाघ कॉलेज, नागपूर), ओम धामडे (न्यू आर्ट्स कॉमर्स, सायंस कॉलेज, वर्धा). प्रशिक्षक- विजय सिंग तोमर, व्यवस्थापक वैधव साठे.






## सामाजिक उद्दिष्ट पूर्तीची महाविद्यालयाने दिली शिकवण
## मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश नितीन सांबरे यांचे प्रतिपादन
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात 'जस्टा कॉजा'चे आयोजन

सामाजिक उद्दिष्ट पूर्तीची शिकवण या महाविद्यालयाने दिली असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती नितीन डब्ल्यू. सांबरे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात शुक्रवार, दिनांक १५ मार्च ते १७ मार्च २०२४ दरम्यान २१ वा वार्षिक राष्ट्रीय कायदा महोत्सव जस्टा कॉजा २०२४ आयोजित करण्यात आले आहे. जस्टा कॉजा महोत्सवाच्या शुक्रवार, दिनांक १५ मार्च रोजी झालेल्या उद्घाटनप्रसंगी न्यायमूर्ती नितीन सांबरे मार्गदर्शन करीत होते.

उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती नितीन डब्ल्यू. सांबरे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, संयोजक डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून अभिमान वाटत असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा येथे येण्याची संधी मिळाल्याचा आनंद होत असल्याचे न्यायमूर्ती सांबरे पुढे बोलताना म्हणाले. १९८८ मध्ये या महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळेस काही मोजकेच विधी महाविद्यालय होते. या महाविद्यालयात शिक्षण घेत असताना निर्माण झालेले ऋणानुबंध आजही तसेच कायम आहेत. १९९१-९२ या शैक्षणिक सत्रात विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडून आलो. त्यावेळी विद्यमान उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस हे देखील महाविद्यालयीन विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी होते. मात्र ते विरोधी पॅनलचे होते, असा अनुभव त्यांनी यावेळी त्यांच्या भाषणात विशद केला. या महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटना आहे. माजी विद्यार्थ्यांना हे महाविद्यालय विसरत नसल्याचे ते म्हणाले. विधी क्षेत्रातील सर्वोच्च मापदंड आणि आयुष्याच्या प्रवासात सर्वोत्तम काय करावे याची शिकवण याच महाविद्यालयातून मिळाली आहे. सामाजिक उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी विचार करण्याची क्षमता तसेच त्याच्याशी लढण्याची प्रेरणा येथूनच मिळाली आहे. या महाविद्यालयाला मोठा इतिहास असून अनेक नामवंत विधीज्ञ या महाविद्यालयाने दिले आहेत. मला देखील या स्थानावर पोहोचण्याचे श्रेय महाविद्यालयाचेच आहे. १९८९ मध्ये महाविद्यालयात झालेल्या वादविवाद स्पर्धेत सहभागी झाल्यानेच मंचावर उभे राहण्याचे धाडस निर्माण झाले. अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होत कठीण परिश्रम करीत समाजातील समस्यांची सोडवणूक करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मार्गदर्शन करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी मागील २१ वर्षांपासून महोत्सवाचे सातत्याने आयोजन होत असल्याने कौतुक केले. समाजात झपाट्याने बदल होत आहे. गरजा बदलल्या आहे. पूर्वी मोबाईल नसल्याने संवादाची माध्यम वेगळी होती. आता मोबाईलने संवादाचे माध्यमच बदलले असून त्याने विचार देखील बदलण्यास सुरुवात झाली आहे. संवाद माध्यमांची प्रगती झाली असली तरी न्यायालयात प्रकरणांची संख्या देखील तेवढ्या झपाट्याने वाढत आहे. तंत्रज्ञान, संवाद वाढला तरी समाजातील एकमेकांत दुरावा निर्माण होत आहे. त्यांना न्यायालयात जाण्याची का गरज भासते. समाजात संवाद का होत नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. समाजात वाढत असलेला विसंवाद लक्षात घेता, न्याय देताना दोन्ही पक्षातील संवाद वाढावा असे न्यायदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी विचार व्यक्त करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे सांगितले. महोत्सवातील विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून विद्यार्थ्यांना थेट न्यायालयीन कामकाजाच्या अनुभवाची संधी प्राप्त होणार असल्याचे डॉ. दुधे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी महाविद्यालयाच्या इतिहासात हा महत्त्वपूर्ण क्षण असल्याचे सांगितले. पुढील वर्षी महाविद्यालय शताब्दी वर्ष साजरे करणार आहे. या राष्ट्रीय विधी महोत्सवात महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड राज्यातील विविध ठिकाणांहून तसेच पारुल, सिम्बोसिस आदी विद्यापीठातील विद्यार्थी देखील या महोत्सवात सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. समय बनसोड, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. पारिजात पांडे, ॲड. फिरदोस मिर्झा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. उद्घाटन या कार्यक्रमाचे संचालन सुप्रिया रानडे व हर्षदा यांनी केले तर आभार संयोजक डॉ. प्रविणा खोब्रागडे यांनी मानले.

### प्रदर्शनीचे उद्घाटन

'जस्टा कॉजा' महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालयात प्राचीन नाणे व हस्तलिखितांची प्रदर्शनी सुरू करण्यात आली आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी प्र- कुलगुरु डॉ संजय दुधे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड प्रामुख्याने उपस्थित होते.




## तज्ञांनी उलगडला प्रेरणादायी जीवन प्रवास

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील युवा परिषद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०२४ पासून 'जस्टा कॉजा' या राष्ट्रीय कायदा महोत्सव आयोजित आहे. या महोत्सवातील 'द नागपूर डायलॉग' युवा परिषदेत तज्ञांनी त्यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास उलगडत विविध विषयांवर विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली.

'द नागपूर डायलॉग' या युवा परिषदेत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोफिजिशियन पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, महाराष्ट्र शासनाचे माजी महाधिवक्ता तथा वरिष्ठ अधिवक्ता ॲड. सुनील मनोहर व व्हीएनआयटी संचालक डॉ. प्रमोद पडोळे यांचा पॅनलिस्ट म्हणून सहभाग होता. युवा परिषदेत सहभागी तज्ञांनी त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाविषयी विद्यार्थ्यांना सुरुवातीला माहिती दिली. या प्रेरणादायी माहितीने कॉन्क्लेव्हची सुरुवात झाली. त्यानंतर "नैतिकता आणि व्यावसायिकतेचा क्रॉसरोड", तंत्रज्ञान आणि औषधांसह कायद्याचा इंटरफेस, मानसिक आरोग्य, व्यावसायिक संतुलन अशा विविध विषयांवर विचारप्रवर्तक संवाद आणि चर्चा झाली. जीवन आणि वैयक्तिक जीवन, वैद्यकीय कायदेशीर प्रकरणे, नवीन शैक्षणिक धोरण, सहयोग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ आदी महत्त्वपूर्ण विषयावर या परिषदेत चर्चा करण्यात आली. देशभरातून विविध संस्थांच्या सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना पॅनेलच्या सदस्यांनी उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली. हा कॉन्क्लेव्ह मेडिसिन आणि टेक्नॉलॉजीसह कायद्याची उत्तमपणे माहिती देणाऱ्या प्रेरणादायक कार्यक्रम ठरला.

महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. प्रविणा खोब्रागडे यांनी स्वागतपर भाषण केले. प्राचार्य डॉ.रविशंकर मोर यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. चिन्मयी निमखेडकर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांच्या कोअर कमिटीने परिश्रम घेतले.

## व्हियतनाम व दक्षिण-पूर्व आशिया" विषयावर डॉ. एस. के. गजभीये यांचे व्याख्यान

### प्रवास व पर्यटन विभागात आयोजन




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता सहअभ्यासक्रम अंतर्गत "व्हियतनाम व दक्षिण-पूर्व आशिया" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. एस. के. टूर आणि ट्रॅव्हल एजंसीचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. एस. के. गजभीये यांचे अतिथी व्याख्यान मंगळवार, दिनांक १२ मार्च २०२४ रोजी संपन्न झाले.

डॉ. गजभीये यांनी आपल्या व्याख्यानात व्हियतनाम येथील ऐतिहासिक पार्श्वभूमी, पर्यटनाचा विकास, सध्याच्या काळात व्हियतनामच्या पर्यटनाकडे आकर्षित होणारे पर्यटक व तेथील बौध्द पर्यटन इ. विषयावर चर्चा केली. विशेष म्हणजे व्हियतनाम देशाचा इतिहास आणि त्यातून पर्यटनाचा झालेल्या विकासामुळे व्हियतनामचा झालेला आर्थिक विकास तसेच लाओस, कंबोडिया, थायलंड, इंडोनेशिया, बाली या दक्षिण-पूर्व आशिया खंडातील देशांच्या पर्यटनाची माहिती दिली. त्यात दक्षिण-पूर्व आशियामध्ये पर्यटन व्यवसायाला वाव आहे, या क्षेत्रातील पर्यटकांना सोयी सुविधा कश्या देता येतील, विमान तिकीट कसे बुक करावे, आइटनररी बनवितांना व आंतराष्ट्रीय पॅकेजेस कश्या प्रकारे बनवावे इत्यादींचे मार्गदर्शन डॉ. गजभीये यांनी केले. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विभागाची माहिती दिली आणि कार्यक्रम नियोजित करण्यात मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन दीपक उके यांनी केले. अतिथी व्याख्यातांचा परिचय आदित्य झाडे यांनी दिला तर आभार रामदास बागडे यांनी मानले. डॉ. अरविंद उपासनी, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. भाग्यश्री हिरादेवे, प्रा. शोभना मेश्राम व प्रा. परिमल सुराडकर यांनी सहकार्य केले. व्याख्यानाकरीता विभागातील दोन्ही सत्रातील विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## प्रवास व पर्यटन विभागात "प्लेसमेंट ड्राईव्ह"

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता सहअभ्यासक्रम अंतर्गत बुधवार, दिनांक १३ मार्च २०२४ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विभागातील विद्यार्थ्यांना इर्स्टनशिप मिळावे व अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळावे या उद्देशाने विभागात "प्लेसमेंट ड्राइव्ह" चे आयोजन करण्यात आले.

यावेळी माजी विद्यार्थी मेळावा देखील घेण्यात आला. यात माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय देतांना पर्यटन क्षेत्रातील विकास व त्यांचा अनुभव व्यक्त केले. प्लेसमेंट ड्राईव्हसाठी नागपूरातील नावाजलेल्या ट्रॅव्हल्स ऐजन्सिजने आपली उपस्थिती लावली. यात आयडीयल टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सचे संचालक इर्शाद मेहदी, निखार ट्रॅव्हल्सच्या सीइओ तृप्ती रोक, जॅगसन्स ट्रॅव्हल्सचे एक्स्युकेटीव्ह डायरेक्टर नंदीनी मुळे, डेस्टिनेशन्स ट्रॅव्हल ऐजन्सिचे राजू आकोलकर व विभागातील माजी विद्यार्थ्यांच्या ट्रॅव्हल एजन्सी प्रोफेशल पैकी राधा खोरघडे, मनिधम्म, विवेक आमडे, आसावरी नांदूरकर, जयश्री अंबादे, राम भांदकर, पराग कस्तुरकर उपस्थित होते. विभागातील एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप करीता व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नोकरी करीता मुलाखती दिल्या. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी कार्यकम नियोजित केला. डॉ. अरविंद उपासनी, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. भाग्यश्री हिरादेवे, प्रा. शोभना मेश्राम व प्रा. परिमल सुराडकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास सहयोग दिला. विभागातील माजी विद्यार्थ्यांसोबत दोन्ही सत्रातील विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## समाजाला प्रगतीपथाकडे नेणे हेच शिक्षणाचे ध्येय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### समाजशास्त्र विभागात वार्षिक स्नेहसंमेलन

समाजाला प्रगतीपथावर नेणे हे समाजकार्य आणि समाजशास्त्र शिक्षणाचे ध्येय असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात चार दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ पार पडला. या कार्यक्रमाची सांगता चतुर्थ सत्रातील विद्यार्थ्यांचे निरोप समारंभाने शुक्रवार दिनांक १५ मार्च २०२४ रोजी झाली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

समाजशास्त्र विभागात आयोजित कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत शैक्षणिक अभ्यासक्रमात कौशल्यपूर्ण शिक्षणाचा सहभाग घेणे तसेच समाजात राहून शिक्षण घेणे महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. दुधे यांनी सांगितले. स्वतःचे यश प्राप्त करण्यास स्वतःतील संघर्षाच्या वाटचालीतून यशाचे शिखर गाठणे फार महत्वाचे आहे. या करिता समाजासाठी काम करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजातील लोकांशी जो पर्यंत आपण सह संबंध प्रस्थापित करू शकणार नाही, तो पर्यंत सामाजिक संबंध स्थापन करू शकणार नाही. म्हणून पैश्यांनी माणूस श्रीमंत होत नाही, तर व्यक्तीने स्वतःच्या स्वभावाने श्रीमंत व्हायला हवे असे डॉ. दुधे म्हणाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. सोबतच समाजशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थी संघटन कार्यकारणी सदस्य डॉ. साधना लांजेवार, डॉ. मोहन नगराळे, डॉ. ज्योती सेलूकर आदी उपस्थित होते. यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ राहुल राऊत यांनी केले.सूत्रसंचालन प्रा. रजत इरपाते यांनी केले तर आभार डॉ. नितीन कायरकर यांनी मानले. या प्रसंगी विभागाचे प्राध्यापक डॉ. पायल चामटकर, डॉ. प्रियंका अंबादे, डॉ. पूनम निमजे, डॉ. राजश्री कापसे, श्रीमती नीता जगताप, श्री. विलास सूर्यवंशी, डॉ. राजश्री रामटेके, डॉ.अमेन झेविअर, डॉ. सदफ खान, आम्रपाली कांबडे, हिना नागभीरे, प्रिन्स गणवीर, प्रतीक झाडे,





# विपश्यना ही मन शुद्ध करणारी विद्या - डॉ. संजय दुधे

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रीय पाली भाषा परिषद

तथागत बुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी या भारतात मनुष्याच्या सुखाचा मार्ग सांगितला आहे. त्या सुखाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी शिकविलेल्या विपश्यना साधनेचा प्रत्यक्ष अनुभव करावा लागतो. त्यांनी सांगितलेली विपश्यना ही मन शुद्ध करणारी विद्या आहे, असे प्रतिपादन प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. पाली -प्राकृत विभाग, बुद्धिस्ट स्टडीज सेंटर आणि पाली प्रचारिणी सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय पाली भाषा परिषद शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०२४ रोजी पार पडली. या परिषदेच्या उद्घाटनिय सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. दुधे बोलत होते.

यावेळी मंचावर उद्घाटक पूज्य भदंत संघरत्न मानके, विभाग प्रमुख डॉ. नीरज बोधी, डॉ. तुळसा डोंगरे, डॉ. प्रतिभा गेडाम, डॉ. अनोमा साखरे उपस्थित होते. विपश्यना माणसाच्या आचार, विचार, व्यवहारात बदल घडवून आणते, असे डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. उद्घाटनिय मार्गदर्शनात पूज्य भदंत संघरत्न मानके यांनी मोठ्या कष्टाने तथागत बुद्धांनी मनुष्याच्या दुःख मुक्तीचा मार्ग शोधून काढला असल्याचे सांगितले. प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. नीरज बोधी यांनी केले. याप्रसंगी कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाद्वारे नुकतेच डि. लीट. प्रदान करण्यात आलेल्या विभागातील संशोधक, प्राध्यापिका डॉ. अनोमा साखरे यांचा सत्कार करण्यात आला. विभागातील विद्यार्थी अशोक रामटेके यांनी अनुवादित केलेल्या आनंद या ग्रंथाचे प्रकाशन सुद्धा करण्यात आले. यावेळी डॉ. प्रतिभा गेडाम यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. परिषदेच्या प्रथम सत्राचे अध्यक्षस्थान माजी विभाग प्रमुख डॉ. मालती साखरे यांनी भूषविले. या सत्रामध्ये डॉ. सुरजित कुमार सिंह (वर्धा), प्रा. सरोज चौधरी -वाणी यांनी आचार्य सत्यनारायण गोयंका यांच्या कार्यावर आणि विचारांवर प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. तलत प्रवीण (पुणे), डॉ. मोहन वानखेडे, मा. कल्पना सोमकुवर, यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. तुळसा डोंगरे यांनी भूषविले. समारोपीय सत्रात मुख्य अतिथी असलेले डॉ. पूरणचंद्र मेश्राम यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की विपश्यनेविषयीचा दुराग्रह सोडून प्रत्यक्ष अनुभव करून बघावे, जेणेकरून आपल्याला सत्यापर्यंत पोहोचता येईल. विविध सत्रातील कार्यक्रमाचे संचालन, डॉ. रेखा बडोले, डॉ. कल्पना मून, डॉ. बिना नगरारे, प्रा. ममता सुखदेवे, योगिता इंगळे यांनी केले.आभार डॉ. ज्वाला डोहाने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता पाली प्रचारिणी सभा आणि विभागातील सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने केला मराठवाडा कृषी विद्यापीठाचा पराभव

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू टी- २० क्रिकेट स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा पराभव केला. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू टी -२० क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने शुक्रवार, दिनांक १५ मार्च रोजी झालेल्या सामन्यात विजय मिळविला.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या संघाने प्रथम फलंदाजी करीत १७ षटकात सर्व बाद ८३ धावा काढल्या. या संघाकडून सर्वाधिक ३४ धावा माणिक ढगे यांनी काढल्या. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सलामी फलंदाजांनी चांगली सुरुवात केली. मात्र, सलामीवीर अक्षय राऊत ६ धावा काढून बाद झाला. सलामी वीर निनाद राऊत यांनी संघाकडून सर्वाधिक ३४ धावा काढल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने १३.३ षटकात सात बाद ८४ धावा काढत विजय प्राप्त केला. उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने श्री. महेंद्र बनकर यांना सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. त्यांनी ४ षटकात १६ धावा देत ४ बळी घेतले. विजयी संघाचे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यापीठाच्या क्रिकेट संघामध्ये दुर्गेश बैस, ईश्वर कुटे, सुरज सूर्यवंशी, रितेश पुरकाम, निलेश रोटके, महेंद्र बनकर, समीर दाणे, रमेश शेवारे, निनाद राऊत, अक्षय राऊत, दीपक घोडमारे, रितेश कांबळे, नितीन खरबडे, स्वप्निल मोडक यांचा खेळाडू म्हणून तर संघ व्यवस्थापक म्हणून श्री. दिनेश दखणे व श्री दर्पण गजभिये यांचा समावेश आहे.

# तंत्रज्ञानामुळे न्यायदानास मिळेल गती

## न्यायमूर्ती नितीन सांबरे यांचे प्रतिपादन

### विद्यापीठ पदव्युत्तर विधी विभागाच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन

बदलत्या सामाजिक स्थितीनुसार न्याय संहितेत बदल आवश्यक असून न्याय प्रणालीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे न्यायदानास गती मिळेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती नितीन डब्ल्यू. सांबरे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर विधी विभाग आणि उच्च न्यायालय बार असोसिएशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने




औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात शनिवार, दिनांक १६ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात न्यायमूर्ती सांबरे मार्गदर्शन करीत होते.

'गुन्हेगारी न्याय सुधारणांचा प्राथमिक विकास आणि तंत्रज्ञानासह त्याचे विविध पैलू' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनिय कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती नितीन डब्ल्यू. सांबरे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, उच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील ॲड. अनिल मार्डीकर, उच्च न्यायालय बार असोसिएशनचे ॲड. अतुल पांडे, विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची उपस्थिती होती. तंत्रज्ञानाचा विकास होत असल्याने त्यापासून फसवणुकीचे गुन्हे देखील घडत आहेत. अशा घटनांमध्ये कठोर शासन होण्याकरिता न्याय संहितेत बदल आवश्यक आहे. फार कमी प्रकरणांमध्ये वादी-प्रतिवादी यांना प्रत्यक्ष न्यायालयात हजर असणे आवश्यक असते. अन्य प्रकरणात आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थिती ग्राह्य धरता येते. सोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने प्रकरणांचा गतीने निपटारा करण्यासाठी विचार करता येईल, असे न्यायमूर्ती सांबरे म्हणाले. प्रत्येक शिक्षकांने तंत्रस्नेही असावे अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे. भारतीय न्याय संहिता, भारतीय साक्ष अधिनियम आणि भारतीय नागरी सुरक्षा संहिता निर्माण करण्यामागील विविध समित्यांनी प्रस्तावित केलेल्या सूचनांची त्यांनी यावेळी माहिती दिली. तीनही नवीन कायद्यामधील कमी करण्यात आलेल्या तसेच नव्याने तयार करण्यात आलेल्या विविध  कलमांबाबत त्यांनी त्यांच्या भाषणांमध्ये विस्तृत माहिती दिली.

वरिष्ठ वकील ॲड. अनिल मार्डीकर यांनी भारतीय न्याय संहिता भारतीय साक्ष अधिनियम आणि भारतीय नागरी सुरक्षा संहिता यामधील विविध बाबींची उपस्थितांना माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या विभागांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे सांगितले. भारतीय न्याय संहितेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याने त्याची जागरूकता या कार्यक्रमाच्या माध्यमातून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ॲड. अतुल पांडे यांनी स्वागतपर तर विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी प्रास्ताविक भाषण करताना विद्यापीठाचे शताब्दी महोत्सवी वर्ष, उच्च न्यायालय बार असोसिएशनचे शताब्दी वर्ष आणि विभागाला ७० वर्ष पूर्ण झाल्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये संपूर्ण देशभरातून ६० पेक्षा अधिक संशोधन पेपर सादर करण्यात आले आहे. उद्घाटनिय कार्यक्रमाचे संचालन करीत आभार रिचा कोचर यांनी मांडले.

## राष्ट्रीय चर्चासत्रात बदलांवर मंथन

राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये 'गुन्हेगारी न्याय सुधारणांचा प्राथमिक विकास आणि तंत्रज्ञानासह त्याचे विविध पैलू' या विषयावर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये प्रादेशिक न्याय वैद्यक प्रयोग शाळेचे उपसंचालक डॉ. विजय ठाकरे, नागालँड पोलीसचे एडीजीपी श्री. संदीप तामगाडगे, सायबर क्राईम तसेच आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त श्री अर्चित चांडक, मानवाधिकार कार्यकर्ता शिखा छिब्बर, एमएनएलयु नागपूर येथील डॉ. विजय तिवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील डॉ. संध्या कलमधाड, विद्यापीठाचे पीजीटीडी विधी विभागातील डॉ. विजयता उईके, स्कूल ऑफ लिगल स्टडीज येथील डॉ. अमित पिल्लई, सिम्बॉयसिस लॉ स्कूल नागपूर येथील डॉ. सचिन त्रिपाठी, दिल्ली विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अजय सोनवणे, नवजीवन विधी महाविद्यालय नाशिक येथील डॉ. समीर चव्हाण, डिकीन विद्यापीठ मेलबोर्न येथील डॉ. शौनिक मुखर्जी यांनी भारतीय न्याय संहिते मधील बदलाबाबत भूमिका विशद केली.




# वादविवाद स्पर्धेने आणली 'जस्टा कॉजा' महोत्सवात रंगत

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात सुरू असलेल्या 'जस्टा कॉजा' महोत्सवात वादविवाद स्पर्धेने रंगत आणली. कायदेशीर कौशल्य आणि वक्तृत्व कौशल्याच्या आकर्षक प्रदर्शनात "डेव्हिल्स ॲटर्नी" या प्रतिष्ठित "जस्टा कॉजा" वादविवाद स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक १६ मार्च २०२४ रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर महापालिकेचे माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी, विद्यापीठाचे लेखा व वित्त अधिकारी श्री. हरीश पालीवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, डॉ. प्रविणा खोब्रागडे यांची उपस्थिती होती. न्यायाधीशांच्या भूमिकेत डॉ. रसिका सत्यजीत दस्तुरे, कै. गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ लॉचे प्राचार्य डॉ. स्नेहल सुनील फडणवीस यांनी कार्य पाहिले. देशाच्या विविध संस्थांमधून सहभागी ७१ विद्यार्थ्यांनी आपले वक्तृत्व आणि कायदेशीर कौशल्य दाखवले. स्पर्धेची सुरुवात उत्साहात झाली. ४० विद्यार्थ्यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. "ओपन सीस विरुद्ध प्रादेशिक पाणी" या विषयावर विद्यार्थ्यांनी त्यांची भूमिका मांडली. बुद्धी आणि वकिलीच्या लढाईत अंतिम फेरीसाठी शीर्ष ८ स्पर्धक निवडले गेले. "निवडणूक जाहीरनामा कायदेशीररित्या बंधनकारक केला जावा" या विषयावर वादविवाद रंगला. अंतिम स्पर्धकांनी त्यांच्या तर्कशुद्ध युक्तिवादाने आणि वक्तृत्वपूर्ण वितरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले, त्यांनी विषयावरील त्यांची समज आणि विस्तृत मांडणी दर्शविली. काजल जाजू आणि सिया चौधरी या स्पर्धकांनी त्यांच्या कौशल्याने उपस्थितांची मने जिंकली. सानिया कोचरने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सहभागी, न्यायाधीश, पाहुणे आणि आयोजकांचे अमूल्य योगदान दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून मनापासून आभार मानले. कार्यक्रमाच्या शिक्षक समन्वयकांकडून मिळालेल्या अतूट पाठिंब्याची कबुली देत प्रा. मेघा धारकर आणि ॲड. पवन कुमार यादव आणि विद्यार्थी समन्वयक शिवम शुक्ला यांनी "जस्टा कॉजा" वादविवाद स्पर्धेच्या यशामागील सहयोगी प्रयत्नांवर प्रकाश टाकला.





# पदव्युत्तर एमसीए विभागात सेल्सफोर्स वर कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर आयआयसीसी- एमसीए विभागात 'सेल्सफोर्स' वर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. एमसीएच्या विद्यार्थ्यांनी सीआरएम तंत्रज्ञानावरील दोन दिवसीय प्रशिक्षणात भाग घेतला. कार्यशाळेच्या उद्घाटन भाषणादरम्यान, डॉ. सतीश शर्मा यांनी सीआरएम तंत्रज्ञानाच्या आवश्यकतेबद्दल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना पूर्ण गुंतवून ठेवण्याचे आणि मनात येणारे कोणतेही प्रश्न मांडण्याचे आवाहन केले. डॉ. नरेंद्र चौधरी व श्री अर्पेश चिरडे यांच्या सहाय्याने दोन दिवसांच्या प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सानुकूल वस्तू आणि सुरक्षा सेटिंग्ज सहसंबंधांचा उपयोग करून लहान ॲप्लिकेशन्स तयार करण्याविषयी ज्ञान मिळवले. सुमारे ५० एमसीए विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्साहाने भाग घेतला. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अरविंद भावे आणि डॉ.मंजिरी व्यवहारे यांनी केले. विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी या कार्यशाळेसाठी पूर्ण सहकार्य केले.




# मातृभाषेचा स्वाभिमान जागवण्याची आवश्यकता

## शिक्षण संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव डॉ. अतुल कोठारी यांचे प्रतिपादन

## शताब्दी पर्व निमित्त राष्ट्रसंत व्याख्यानमाला




मातृभाषेमध्ये गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि साहित्य निर्माण झाल्यास मातृभाषेत शिक्षणाचा विकल्प तयार होईल. त्याकरिता समाजामध्ये भाषेविषयी स्वाभिमान जागृत करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन शिक्षण संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव डॉ. अतुल कोठारी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी पर्व निमित्त सोमवार दिनांक १८ मार्च २०२४ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडलेल्या व्याख्यानमालेत डॉ. कोठारी बोलत होते.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून शिक्षण संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव डॉ. अतुल कोठारी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे व हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पाण्डेय यांची उपस्थिती होती. 'मातृभाषेत शिक्षण' या विषयावर बोलताना डॉ. अतुल कोठारी यांनी आपल्या भाषा सक्षम आहेत, असे सांगितले. जगातील कोणत्याही भाषेच्या तुलनेत आपली भाषा अधिक वैज्ञानिक आहे. केवळ मातृभाषेत अभ्यासक्रम तयार होणे पुरेसे नाही. याकरिता मातृभाषेतून शिक्षण याविषयी समाजातील उदासीनता दूर करावी लागेल. कारण आई, मातृभूमी आणि मातृभाषा याचा कोणताच विकल्प नसल्याचे त्यांनी सांगितले. जगातील सर्वच शिक्षण तज्ज्ञांचा निष्कर्ष हा मातृभाषेतील शिक्षण हाच मनुष्य जीवनाचा आधार आहे. शैक्षणिक सुधारणाच्या दिशेने अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. भारत सरकारने देखील भारतीय भाषा समितीचे गठन केले असल्याचे डॉ. कोठारी यांनी सांगितले. यावेळी माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी मातृभाषेतून शिक्षण दिले गेल्यास दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना देखील उच्च शिक्षणात सहजपणे घेता येईल. मातृभाषेतील शिक्षणातून देशात एकतेस बळ मिळेल, असे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मनोगत व्यक्त करताना समाजाच्या प्रत्येक वर्गाच्या विकासासाठी मातृभूमीतून शिक्षण आवश्यक आहे असे सांगितले. भाषीय गुलामीची मानसिकता दूर करण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पाण्डेय यांनी विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे हे अकरावे पुष्प असल्याचे सांगितले. या व्याख्यानमालेत मातृभाषेतून शिक्षण या विषयावर चर्चा होणे ही फार मोठी उपलब्ध असल्याचे सांगितले. मातृभाषेतून शिक्षण हेच सामाजिक बदलाचा मूड आधार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पाण्डेय यांनी केले तर आभार माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांनी मानले. यावेळी हिन्दी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे, डॉ. मिथिलेश अवस्थी, अविनाश बागडे, नरेन्द्र परिहार, शोभाताई पैठणकर, डॉ. विजय घुगे, डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. सुमित सिंह, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजनलाल, प्रा. जागृती सिंह यांच्यासह विविध शाळा, महाविद्यालय यांचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# 'जस्टा कॉजा' राष्ट्रीय कायदा महोत्सवाचा समारोप

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजित 'जस्टा कॉजा' या राष्ट्रीय कायदा महोत्सवाचा समारोप रविवार, दिनांक १७ मार्च २०२४ रोजी पार पडला. तीन दिवस चाललेल्या राष्ट्रीय कायदा महोत्सवात देशाच्या विविध संस्था विद्यापीठातून सहभागी पासून प्रतिनिधींनी विधी क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा केली.

समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश माननीय न्यायमुर्ती श्री. भरत देशपांडे, रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हरेराम त्रिपाठी, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, समन्वयक डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ. हरेराम त्रिपाठी यांनी मार्गदर्शन करताना कायद्याची उत्पत्ती आणि उत्क्रांती याबाबत माहिती दिली. रेखाचित्र, प्राचीन ग्रंथ आणि ऐतिहासिक व्यक्तींपासून प्रेरणा घेण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. जस्टा कॉजा २०२४ कोअर कमिटीचे आयुष आओले यांनी मनापासून आभार मानले. सामूहिक प्रयत्नांमुळे कार्यक्रम शक्य झाला असून प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व समित्यांचे अमूल्य योगदान अधोरेखित केले.







## 'युवारंग' नवीन कलावंत घडविणारा रंगमंच - डॉ. संजय दुधे

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालय युवा महोत्सवास सुरुवात

'युवारंग' नवीन कलावंत घडविणारा रंगमंच असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवास मंगळवार, दिनांक १९ मार्च २०२४ पासून सुरुवात झाली आहे अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे युवारंगचे उद्घाटन सकाळी पार पडले. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

उद्घाटनिय कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक, सांस्कृतिक समन्वयक श्री. प्रकाश शुक्ला यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी आपल्या समाजातील पारंपारिक लोककला जोपासण्याची गरज असल्याचे सांगितले. आधुनिकीकरण वाढल्याने आपली लोककला, लोक साहित्य लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. या लोककलांना जिवंत ठेवण्याचे दायित्व तरुण पिढीने घेण्याची गरज आहे. किर्तन, दंडार, तमाशा, मंडई आदी लोककला पूर्वी गावोगावी दिसून येत होत्या. या लोककलांना लोकाश्रय देखील मिळत होता. लोककला हाच कलावंतांचा उदरनिर्वाहाचे साधन होते. हेच त्यांचे स्टार्टअप होते. विविध जाती-धर्माच्या विविध कला असलेला आपला देश आहे. या युवारंगच्या माध्यमातून अनेक लोककला समोर येतील, असे डॉ. दुधे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी युवारंग महोत्सवात १०० पेक्षा अधिक महाविद्यालयातून १२०० विद्यार्थी सहभागी झाले असल्याचे सांगितले. युवा महोत्सवात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार सांस्कृतिक समन्वयक प्रकाश शुक्ला यांनी मानले.

#### विविध कलागुणांची उधळण

'युवारंग' आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात चार दिवस विद्यार्थ्यांकडून कलागुणांची उधळण केली जाणार आहे. युवा महोत्सवामध्ये सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, समूहगीत स्पर्धा, शास्त्रीय ताल, ताण वाद्य स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा, वेस्टन सोलो, वेस्टर्न इन्स्टुमेंटल सोलो, पेंटिंग, पोस्टर, क्ले मॉडलिंग, व्यंगचित्र, कोलाज, रांगोळी, स्कीट (लघुनाटिका), माईम (मूकनाट्य), मिमिक्री, शास्त्रीय नृत्य, लावणी, लोकनृत्य आदी विविध स्पर्धांचे सादरीकरण होणार आहे.






## बायोमेडिकल उपकरणावर प्रशिक्षण कार्यक्रम - विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकरिता व्याख्यान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बायोमेडिकल उपकरणावर प्रशिक्षण कार्यक्रम व व्याख्यानाचे आयोजन १८ ते १९ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आले. औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात हा कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि होरीबा इंडिया टेक्निकल इन्स्टिट्यूट (HITI) नागपूर यांच्याद्वारे संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटनिय कार्यक्रमाला विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, औषधी निर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, होरिबा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पुष्कर आदमाने, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. निशिकांत राऊत यांची उपस्थिती होती. मूलभूत रक्त विज्ञान मोजणीची तत्वे, मापन तंत्र, बायोकेमिस्ट्री प्रकार, मेट्रोलॉजी विश्लेषण, नॅनोपार्टिकल साईज आदी विविध विषयांमध्ये या कार्यक्रमात व्याख्यान आयोजित केले गेले.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी होरिबा इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे वरिष्ठ विज्ञानिक डॉ. पुष्कर आदमाने यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे वापरात येणारे मूलभूत तंत्रज्ञानाच्या वापराबाबत माहिती दिली. एसडीए वर्गीकरण, आयविडी साधने परिचय, गुणवत्ता निमंत्रण, कॅलिब्रेशन आणि देखभाल मूलभूत संकल्पना या विषयात पुष्कर आदमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री मुरली एस.आर. यांनी रक्तविज्ञान मोजण्याची तत्वे आणि अहवाल मापदंड, इन्स्ट्रुमेंट मधील मापन आणि प्रयोग या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. सूत्रम सुब्रमण्यम यांनी मापन तंत्रज्ञान, बेअर-लेम्बर्ट कायदा आणि त्याचे अनुप्रयोग, बायो केमिस्ट्री चाचण्यांच्या प्रकार, कोलाब्रेशन आणि QC मॉड्युल याबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. डॉ. एस.सी. सुदिक्षा यांनी मापन तंत्रज्ञान तपशील, परिणाम आणि पॅरामीटर्सचे स्पष्टीकरण, भिन्न मोड आणि विविध अनुप्रयोग या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला औषधी निर्माण शास्त्र, बीएससी, एमएससी तसेच पीएचडी संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन महिला संघाची घोषणा अ. भा. बॉल बॅडमिंटन स्पर्धा

चेन्नई येथील डिंदीगुल यांच्या वतीने अण्णा विद्यापीठाच्या यजमानपदाखाली २१ ते २४ मार्च दरम्यान आयोजित अखिल भारतीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ महिला संघ रवाना झाल्याची माहिती विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

विद्यापीठाचा महिला संघ- प्राजक्ता सावरकर, वृषाली उमक (नबीरा महाविद्यालय), बुशरा पठाण, उत्कर्षा सहारे (बजाज सायंस कॉलेज, वर्धा), मेघा उके (जेएम पटेल महा. भंडारा), निकीता तिवारी (नागपूर इन्स्टि. ऑफ टेक्नॉलॉजी), तृप्ती नंदेश्वर (नागपूर शारी. शिक्षण महाविद्यालय), अपेक्षा पिंपळे (डॉ. आर. जी. भोयर महाविद्यालय सेलू), खुशी जेक्सेनीया (जीएस कॉलेज, नागपूर), धनश्री चनोडे (डॉ. वासनिक कॉलेज). राखीव खेळाडू- अंकिता भांगे (नागपूर शारी. शिक्षण महाविद्यालय), रजनी (व्हीएन शारी. शिक्षण महाविद्यालय), राणी गवघवे (इंद्रप्रस्त महाविद्यालय, वर्धा).










## सुर संगीताने निनादला युवारंग

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा युवा महोत्सव

ए मेरे वतन के लोगों.... हीच आमची प्रार्थना आणि हेच आमचे मागणे..... काळ्या मातीत मातीत तिफण चालते.... अशा सुगम, शास्त्रीय, समूह, तान वाद्य, संगीताने युवारंग निनादला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 'युवारंग' युवा महोत्सव गुरुनानक भवन अंबाझरी रोड येथे सुरू आहे. महोत्सवाच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी संगीत स्पर्धा आणि साहित्य स्पर्धा पडल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या कला गुणांना भरभरून वाव मिळाला.

संगीत स्पर्धेमध्ये सुगम संगीत प्रकारात ३६, शास्त्रीय संगीत १९, समूहगीत २८, शास्त्रीय ताल १५, ताण वाद्य १६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. भारतीय संगीत कलेची ओळख आणि

भारतीय संगीत संस्कृती विषय विद्यार्थी जागृत व्हावे याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने युवारंग नावाने विद्यार्थ्यांकरिता मंच उपस्थित केला. यामध्ये १०० पेक्षा अधिक महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी महाविद्यालय नागपूरच्या विद्यार्थ्यांनी काळ्या मातीत मातीत आणि हीच आमची प्रार्थना समूह गीत सादर केले. श्री रामदेव बाबा महाविद्यालय नागपूरच्या विद्यार्थ्यांनी 'जननी' गीत सादर केले. ए मेरे वतन के लोगो समूहगीत शिवाजी सायन्स कॉलेज नागपूरचे विद्यार्थ्यांनी सादर केले. साहित्य स्पर्धेमध्ये वेस्टन सोलो आणि वेस्ट इन्स्ट्रुमेंट सोलो या दोन स्पर्धा पार पडल्या. वेस्टन सोलो मध्ये १८ विद्यार्थ्यांनी कला सादर केली. वेस्टर्न इन्स्ट्रुमेंट सोलो मध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.




## माडी वरती उभी राहुनी वाट पाहिली काल...
### अशा एकापेक्षा एक सरस लावण्यांनी गाजला 'युवारंग'

माडी वरती उभी राहुनी वाट पाहिली काल... वाटलं होतं तुम्ही याल.. राया, नटले तुमच्यासाठी, चंद्रा अशा एकापेक्षा एक सरस लावणी नृत्य सादर करीत विद्यार्थ्यांनी 'युवारंग' गाजविला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 'युवारंग' युवा महोत्सव स्थानिक अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे सुरू आहे. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी बुधवार, दिनांक २० मार्च २०२४ रोजी लावणी नृत्य स्पर्धा पार पडली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लावणीला उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

स्थानिक समाजातील पारंपरिक लोककला कायम राहाव्यात म्हणून विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 'युवारंग' हा युवा महोत्सव १९ मार्च ते २२ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पारंपरिक लोककला असलेल्या लावणी स्पर्धा युवा महोत्सवात घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये एकूण ६५ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. लावणी नृत्य स्पर्धेमध्ये मुलींबरोबर मुलांनी देखील सहभागी होत एकापेक्षा एक सरस लावणी प्रस्तुत केली. यामध्ये 'कोण्या गावाचं आलं पाखरू: ही लावणी शासकीय न्याय वैद्यकीय महाविद्यालय ची विद्यार्थिनी वैष्णवी देशमुख हिने सादर केली. हिस्लाप महाविद्यालयाची विद्यार्थिनी आर्या धनविजय, फार्मसी कॉलेज बोरगाव येथील श्रेया ठाकरे, निकालास महिला महाविद्यालयाची श्रद्धा काकडे, वैष्णवी मालवे यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनी आपल्या लावणी नृत्यातून उपस्थितांची मने जिंकली.

### विद्यार्थ्यांनी फुलला शैक्षणिक परिसर

युवा महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठ परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थी- विद्यार्थिनी 'युवारंग' मध्ये सहभागी होत आहे. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांमुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शैक्षणिक परिसर फुलून गेला आहे. विविध महाविद्यालयातून तब्बल १२०० ते १५०० विद्यार्थी या युवा महोत्सवात सहभागी होत आहे.




## पुरुषांच्या सेपकटाकरामध्ये विद्यापीठाला कांस्यपदक - अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धा

कुरनूल येथील रायलसीमा विद्यापीठाच्या यजमान पदाखाली घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सेपकटाकरा स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने तिसऱ्या स्थानासह कांस्यपदक प्राप्त केले.

मागील वर्षी लीग स्टेजपर्यंत पोहचणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा बाद सामना यजमान रायलासीमा

विद्यापीठासोबत झाला. यात २-० ने विद्यापीठाने विजय नोंदवित लीग स्टेजमध्ये यंदाही आपले स्थान पक्के केले. यानंतर लीगच्या पहिल्याच सामन्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने कॅलिकट विद्यापीठाचा २-१ गुणांनी नमवित विजयी सुरुवात केली. मात्र, यानंतर दोन्ही सामन्यात विद्यापीठाला पराभव स्वीकारावा लागला. आधी पंजाबी विद्यापीठ पटीयालाने २-१ ने आणि पंजाब विद्यापीठ चंदीगड संघाने ३-० ने मात दिली. मात्र, तिसऱ्या स्थानी राहणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने कांस्यपदक प्राप्त केले. सुवर्णपदक पंजाबी विद्यापीठ पटियाला, द्वितीय स्थान पंजाब विद्यापीठ चंदीगडने प्राप्त केले. विद्यापीठाच्या संघाने केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे. स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या पुरुष संघाची निवड डॉ. अमित कन्वर, डॉ. आशुतोष तिवारी, डॉ. दिलीप कोहळे, डॉ. अमृता पांडे यांनी केली.

विद्यापीठाचा विजयी संघ पुढीलप्रमाणे-लेहांशू लाडके, सौरभ कोसुळकर, ओम मुळे (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायंस कॉलेज, वर्धा), अनिकेत काळे (शांतीनिकेत बिझनेस स्कूल नागपूर), शाह तनवीर (रेणुका महाविद्यालय), फैजान शेख (धनवटे नॅशनल कॉलेज), निलेश पाचे, गौरव मिसार (एमबी पटेल कॉलेज सालेकसा), मो. अली, शहनावाज खान (नागपूर शारी. शिक्षण महा. नागपूर), कुणाल इवनाते (यशवंत महाविद्यालय वर्धा), कमरान अंसारी (हिस्लॉप कॉलेज), आदित्य नागतोडे (जगत आर्ट्स कॉलेज, गोरेगाव). प्रशिक्षक- विजय सिंग तोमर, व्यवस्थापक वैधव साठे.



## क्ले मॉडलिंग मधून विद्यार्थ्यांनी साकारले प्रेमाचे भाव

### -राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा युवा रंग युवक महोत्सव अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे सुरू आहे. या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी क्ले-मॉडलिंग च्या माध्यमातून प्रेमाचे भाव साकारले आहे.

क्ले मॉडलिंग स्पर्धेमध्ये १८ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदवत प्रेम या विषयावर चिकन मातीला विविध रूप देत विद्यार्थ्यांनी प्रेमाचे भाव साकारले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ द्वारा आयोजित आंतर महाविद्यालय युवा महोत्सवाचा दुसरा दिवस पार पडला. क्ले -मॉडलिंग मध्ये आई आणि नवजात बाळांचे प्रेम, शंकर-पार्वती मधील प्रेमाची भावना, वृक्षावरील मानवाचे प्रेम, राधा-कृष्णा मधील प्रेमाची भावना, मूर्ती मधून विद्यार्थ्यांनी प्रेमाचे भाव साकारले. पेंटिंग, पोस्टर, व्यंगचित्र, या ललित कला स्पर्धेमध्ये ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. पेंटिंग मध्ये 'फेस्टिवल' या विषया वर पोस्टर मध्ये 'लँडस्केप' आणि व्यंगचित्र मध्ये चर्चेचा विषय निवडणूक या विषयावरील विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. कोलाज, रांगोळी या विविध स्पर्धा पार पडल्या.




## शास्त्रीय नृत्य, नाट्य व मूकनाट्यने केले मंत्रमुग्ध

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा युवा महोत्सव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या युवारंग युवा महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी शास्त्रीय नृत्य नाट्य व मूकनाट्यने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. नाट्य, मूक-नाट्य, मिमिक्री व शास्त्रीय नृत्य स्पर्धा गुरुवार दिनांक २१ मार्च २०२४ रोजी आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत ९६ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

शास्त्रीय नृत्य स्पर्धेत कथक व भरतनाट्यम करत युवकांनी हरि-रंग सादर केले. नाट्य व मूक-नाट्य स्पर्धेत स्पर्धकांनी आपली नाट्यकला प्रस्तुत करत 'मतदान जागरूकता', 'स्त्री सशक्तिकरण व सुरक्षा', व प्रकृती संरक्षण' सारख्या गंभीर विषयांवर दर्शकांना विचार करण्यास भाग पाडले. शिवराज्याभिषेक सोहळ्याची अप्रतिम प्रस्तुती विद्यार्थ्यांनी सादर केली. शास्त्रीय नृत्य कलेचे परीक्षण अपूर्वा खांगण, कामाक्षी हम्पीहोली व सूचना भावसार यांनी केले. नाट्य, मूक-नाट्य व मिमिक्रीचे परीक्षण जय गाला, सारंग गुप्ता व डॉ. संयुक्ता थोरात यांनी केले. सारंग गुप्ता (थियेटर कोच) यांनी आपले भाव व्यक्त करत सांगितले, "या गोष्टीचा आनंद वाटतो की युवारंगात फाईन आर्ट्सच्या विद्यार्थ्यांसह अभियांत्रिकी व प्रबंधन क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्साहाने सहभाग घेतला. जय गाला सांगतात की, "मला युवारंग साकार झाल्यासारखा वाटतो कारण हा फक्त नागपूरात सिमीत न राहता वर्धा, लाखनी, कोराडी व अन्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला, असल्याचे सांगितले.











## चवदार तळ्याचे आंदोलन व्यवस्था मुक्तीचा प्रवाह
## प्रा.रणजित मेश्राम यांचे प्रतिपादन

महाड तळ्याचे आंदोलन ही केवळ घटना नव्हे तर ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या समग्र आंदोलनाच्या मुक्तीचा प्रवाह आहे, असे प्रतिपादन प्रा. रणजित मेश्राम यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आणि विचारधारा विभागाच्या वतीने 'महाडच्या चवदार तळ्याचे आंदोलन: आजची प्रासंगीकता' या विषयावर बुधवार, दिनांक २० मार्च २०२४ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून मेश्राम बोलत होते.

यावेळी मंचकावर विभाग प्रमुख प्रा. डॉ. अविनाश फुलझेले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. पुढे मार्गदर्शन करताना मेश्राम म्हणाले की, तत्कालीन परिस्थितीत हिंदुत्वाचा आग्रह धरणारे भूतकाळातील परंपरा, वैभव यात रममान होत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मात्र, अस्पृश्यांच्या मुक्तीचा लढा लढत होते. चवदार तळ्याच्या आंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू मानसिकता असणाऱ्या उच्च वर्णीयांची, इंग्रजांची आणि अस्पुश्यांची जबाबदारी निश्चित केली होती. सायमन कमिशनला दिलेली साक्ष आणि इंग्लडला झालेल्या पहिल्या आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेमुळे डॉ. बाबासाहेबांना जागतिक स्तरावर नेतृत्व म्हणून मान्यता मिळाली होती. त्याचे मुख्य कारण महाडचे आंदोलन आहे, हे नाकारता येणार नाही. या आंदोलनाने एकूणच चित्र बदलले होते. त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण राष्ट्रीय नेतृत्व करू शकतो, हा विश्वास निर्माण झाला होता. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन मिथुन दुपारे यांनी केले तर आभार भीमराव फुसे यांनी मानले. या कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापक गण, विद्यार्थी - विद्यार्थिनी व इतर मान्यवर उपस्थित होते.




## महिलांनी पर्यावरणपूरक मेन्स्टुअल कपचा वापर करावा
## स्त्रीरोग सल्लागार डॉ. पारूल सावजी यांची माहिती
## विद्यापीठ महिला वसतिगृहात जनजागृती कार्यक्रम

निदान त्या पाच दिवसांत आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, पर्यावरणपूरक मेन्सट्रुअल कप वापरावे, असे वक्तव्य सौंदर्यशास्त्रीय स्त्रीरोग सल्लागार, सर्जन आणि इन्फर्टिलिटी विशेतज्ञ डॉ. पारूल सावजी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महिला वसतिगृह नागपूर येथे मासिकपाळीच्या दिवसांत काळजी कशी घ्यावी, याबद्दल जनजागृती करण्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ. सावजी मार्गदर्शन करीत होत्या.

यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. सावजी यांनी 'मासिक पाळीमुळे अनेक रुढी-परंपरा, गैरसमज आजही आपल्या समाजात आहेत. परंतु ही नैसर्गिक प्रक्रिया असून आपण या दिवसांत आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन विद्यार्थिनींना केले. दररोज व्यायाम करावा, कुठलिही समस्या असल्यास स्त्रीरोग तज्ञांची मदत घ्यावी, यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले व मुलींनी विचारलेल्या प्रश्नांचे निवारण डॉ. सावजी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसतिगृहाच्या वरिष्ठ अधिक्षिका डॉ. रिता वडेटवार, वसतिगृहाच्या अधिक्षिका सरोज लांजेवार या उपस्थित होत्या. संचालन जान्हवी मंजुळे या विद्यार्थिनीने केले तर डॉ. वडेटवार यांनी आभार मानले.

## हिस्लॉप महाविद्यालय 'युवारंग'चे चॅम्पियन - जी. एस. कॉलेज ठरले उपविजेते

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचा समारोप









राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'युवारंग' या युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद नागपूर येथील हिस्लॉप महाविद्यालयाने पटकावले. जी. एस. महाविद्यालय दुसऱ्या क्रमांकावर राहिले. गोल्डन बॉय चा पुरस्कार सत्यजित तर गोल्डन गर्लचा पुरस्कार कु. इंद्राणी इंदुरकरने पटकाविला. कलेवर प्रेम असणाराच खरा कलावंत ठरतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी युवा महोत्सवाच्या समारोपप्रसंगी शुक्रवार, दिनांक २२ मार्च २०२४ रोजी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने गुरुनानक भवन येथे १९ ते २२ मार्च दरम्यान आयोजित युवा रंगाचा पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवारी रात्री पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी यशस्वी तसेच पुरस्कार पटकाविणाऱ्या विद्यार्थी व महाविद्यालयांचे अभिनंदन केले. युवारंगात युवक रंगले असून कितीतरी दिग्गज कलाकार शैक्षणिक क्षेत्रातून केलेल्या कलेच्या जोरदार सादरीकरणाने यशस्वी झाल्याचे डॉ. दुधे यांनी सांगितले. पुरस्काराची घोषणा सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांनी केली. हिस्लॉप महाविद्यालयाने संगीत, नृत्य आणि थिएटर प्रकारातील ट्रॉफी देखील पटकावली. साहित्य स्पर्धा प्रकारातील ट्रॉफी विद्यापीठाचा पदव्युत्तर विधी विभाग आणि जीएस कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्सने पटकावली. ललित कला प्रकारातील ट्रॉफी एम. जे. कॉलेज व जी.एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्सने पटकावली.

शास्त्रीय संगीत स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पार्वती नायर तर, सुगम संगीत मध्ये श्रेयश मासुरकर, शास्त्रीय ताल मध्ये सुयोग देवलकर, ताण वाद्य मध्ये यशोधन देशपांडे, समूहगीत मध्ये हिस्लॉप महाविद्यालय नागपूर, सोलो मध्ये आदी रिंगे, वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल सोलो मध्ये हर्षद मौंदेकर, वादविवाद स्पर्धा मध्ये जी.एस. महाविद्यालय नागपूर, प्रश्नमंजुषामध्ये विद्यापीठाचा पदव्युत्तर विधी विभाग, पेंटिंग स्पर्धेमध्ये प्रीती भौमिक, पोस्टर स्पर्धेमध्ये निधी भुसारी, कोलाज मध्ये प्रियंका मन्ना, कार्टूनींगमध्ये शिवम नंदगेवे, क्ले मॉडलिंग मध्ये निलाक्षी पराते, रांगोळी स्पर्धेमध्ये मयुरी वानी, स्किट स्पर्धेमध्ये हिस्लॉप महाविद्यालय नागपूर, माइम स्पर्धेमध्ये श्री रामदेव बाबा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट नागपूर, मिमिक्री स्पर्धेमध्ये भुवन मेश्राम, शास्त्रीय नृत्य इंद्राणी इंदुरकर, लावणी स्पर्धेमध्ये आस्था वांधारे, लोकनृत्य स्पर्धेत हिस्लॉप महाविद्यालय नागपूर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.११६ पेक्षा अधिक महाविद्यालय आणि २४३० विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सहभाग घेतला, अशी माहिती सांस्कृतिक समन्वय श्री. प्रकाश शुक्ला यांनी दिली. कार्यक्रमाचे आयोजक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. मंगेश पाठक श्री.प्रकाश शुक्ला, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोहन वरठी, सारंग गुप्ता, जय गाला, मुकेश गौतम, स्वप्नील खरे, पूनम गिर्हे, चिराग शुक्ला, मोहित सरकार, मुस्कान महतो, खुशाली मेश्राम, भागवत जागळे, सुमित ठाकरे, नम्रता सिंह, विनोद हजारे यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## विद्यापीठ हिवाळी परीक्षांचे सर्व निकाल घोषित

### स्वायत्त विभागाचे १३६ परीक्षांच्या निकालांचा समावेश

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या संलग्नित महाविद्यालय तसेच स्वायत्त विभागांचे हिवाळी २०२३ परीक्षांचे सर्व निकाल घोषित करण्यात आले आहे. यामध्ये विद्यापीठाच्या ४२ स्वायत्त विभागांच्या निकालाचा समावेश असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने हिवाळी २०२३ मध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या विविध ११८६ तर स्वायत्त विभागांच्या एकूण १३६ परीक्षा घेण्यात आल्या होत्या. विद्यापीठाच्या ४२ स्वायत्त विभागांच्या १३६ विविध परीक्षांचे निकाल देखील घोषित करण्यात आले आहे. विद्यापीठ स्वायत्त विभागाच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात अडचणी असल्याचे निदर्शनास आले होते. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे स्वायत्त विभागांचे निकाल देखील तातडीने घोषित करण्याची कारवाई परीक्षा व मूल्यमापन मंडळांकडून करण्यात आली.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा वॉटर पोलो संघ जाहीर

गुरुनानक देव विद्यापीठाच्या यजमानपदाखाली जालंधर येथे २९ ते ३१ मार्चदरम्यान होणाऱ्या पुरुषांच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वॉटर पोलो स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वॉटर पोलो संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी नुकतीच केली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा संघ पुढील प्रमाणे- अभिषेक लोहकरे (आयडीसीपीई), वेदांत येरणे (हिस्लॉप कॉलेज), जयंत दुबळे (ज्योतिबा कॉलेज शारी. शिक्षण कॉलेज), शंतनू खोलकुटे (सुर्योदय कॉलेज), हर्षल अंबागडे, सुयोग निकुते, पुष्पक लांडे, अर्जून भोसले (सर्व एमएम सायंस कॉलेज), प्रभात उईके (व्हीएन शासकीय कला आणि सोशल सायंस कॉलेज), शंतायू भोकरे, ए. पी. अमन (पीजीटीडी कॉलेज). राखीव- तन्मय जगताप (नागपूर शारी. शिक्षण महा.), सर्वध्य चामट (एमएम सायंस कॉलेज), कांशी मते (डॉ. आंबेडकर कॉलेज). प्रशिक्षक अमोल रायपुरकर, व्यवस्थापक प्रकाश माकडे.

## विद्यापीठात भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांचा 'शहीद दिन' संपन्न



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शनिवार, दिनांक २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य युध्दातील योध्दा तसेच थोर क्रांतीकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांचा शहीद दिन विद्यापीठात संपन्न झाला. याप्रसंगी उपकुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. शहीद दिन कार्यक्रमाला मधुकरराव इंगोले, कार्तिक हरडे, आसिफ शेख, सुशिल, प्रणय यांच्या सह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## 'स्वच्छ शेजारी प्रत्येकाची जबाबदारी' उपक्रम संपन्न
### विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागाच्या वतीने 'स्वच्छ शेजारी प्रत्येकाची जबाबदारी' हा उपक्रम शुक्रवार, दिनांक २२ मार्च २०२४ रोजी राबविण्यात आला. जागतिक जल दिनाच्या निमित्ताने दरवर्षी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मानवासह सजीव सृष्टीसाठी सर्वात महत्त्वाच्या नैसर्गिक संसाधनापैकी पाणी महत्वपूर्ण आहे. पाण्याचे संवर्धन हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. पाण्याची गरज भागविण्याकरिता विहिरी खोदून मानवाने उथळ जलस्त्रोत निर्माण केले. मात्र, बहुतांश खोदलेल्या विहिरीतील पाणी दूषित असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे पाण्याची गुणवत्ता लक्षणेरीत्या खालावली आहे. कचरा आणि टाकाऊ पदार्थ टाकल्या गेल्याने भोजलातील हे पाण्याचे तळे दूषित होण्याचे प्रमुख कारण आहे. मोकळ्या जागी असलेल्या विहिरी प्रामुख्याने प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्या आहे. विहिरींसोबतच नैसर्गिक जलस्त्रोत प्रदूषण मुक्त होत स्वच्छ आणि घनकचऱ्यापासून मुक्त ठेवणे महत्त्वाचे आहे. या दृष्टिकोनातून भूगर्भ शास्त्र विभागाने जागतिक जलदिनानिमित्त हा उपक्रम राबविला. या उपक्रमात भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, प्रा. अनिल पोफरे, डॉ. हेमंत खंदारे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये राजू कुकडे, राजेश लांडगे, जितेंद्र चौधरी, सुचित्रा मेंढे, प्रतीक गोडबोले, कौस्तुभ देशपांडे, अतुल नारूकर, ममता जांभुळकर, नेहा ठाकरे, कृतिका जंगले यांच्यासह विद्यार्थी संशोधक अभ्यासक शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.



## स्पर्धा प्रशिक्षण केंद्रातून शिक्षिका म्हणून निवड -नीता मडावीची संभाजीनगर येथे मिळाली नियुक्ती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अनुसूचित जमात शोध व प्रशिक्षण केंद्रातील (टिआरटीआय) विद्यार्थिनीला संभाजीनगर जिल्ह्यात शिक्षण सेवक (शिक्षिका) म्हणून नियुक्ती मिळाली आहे. नीताबाई प्यारेलाल मडावी असे विद्यार्थिनीचे नाव आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अनुसूचित जमात शोध व प्रशिक्षण केंद्र (एसटी-युपीएससी (टिआरटीआय)) चालविण्यात येते. या प्रशिक्षण केंद्रातील नीताबाई मडावी यांची महाराष्ट्र शासनाच्या माध्यमाने चालविण्यात येणाऱ्या पवित्र पोर्टलच्या वतीने संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड तालुक्यातील शिंदेफळ येथे जिल्हा परिषद प्राथमिक पदवीधर शिक्षण सेवक (शिक्षिका) म्हणून नियुक्ती झाली आहे. विद्यार्थिनीने तिच्या यशाचे श्रेय आई-वडील तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. सुरेश मसराम, समन्वयक डॉ. हरीश बावनगडे यांना दिले आहे. विद्यार्थिनीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





## मॅक्ला ॅईड्स फार्मात ४४ विद्यार्थ्यांची निवड विद्यापीठ प्लेसमेंट ड्राईव्ह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात मॅक्ला ॅईड्स फार्मा कंपनीच्या वतीने आयोजित प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ४४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने या रोजगार मेळाव्याचे आयोजन रसायनशास्त्र विभागात शनिवार, दिनांक १६ मार्च २०२४ रोजी करण्यात आले.

रसायनशास्त्र विभागात आयोजित रोजगार मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, मॅक्ला ॅईड्स फार्माच्या सेंटर फॉर एक्सलन्सचे श्री धरमपाल, दमन येथील प्लांट एचआर भव्या देसाई, मुंबई येथील कार्पोरेट एचआर मीनाक्षी बयस्वार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. रसायनशास्त्र विभाग आणि औषधी निर्माण शास्त्र विभाग यातील पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी या रोजगार मिळावायचे आयोजन करण्यात आले होते. बीफार्म तसेच बीएससीच्या विद्यार्थ्यांना २६ हजार रुपये प्रती माह तर एमएससी तसेच एमफार्मसाठी ३६ हजार रुपये असे वेतन या कंपनीकडून दिले जाणार आहेत. कंपनीकडून ग्रॅज्युएट ट्रेनिंग या पदाकरिता विद्यार्थ्यांच्या सुरुवातीला चाळणी परीक्षा घेण्यात आली. या रोजगार मेळाव्याकरिता एकूण १५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती तर १२० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यातून ४४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.



## जेएम पटेल कॉलेजला दुहेरी जेतेपद आंतर महाविद्यालयीन आट्यापाट्या स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन आट्यापाट्या स्पर्धेत भंडाऱ्याच्या जे. एम. पटेल कॉलेजने प्रतिस्पर्धीला मात देत अजिंक्य राहण्याचा मान मिळविला.

रवी नगरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेतील अंतिम लढत जे. एम. पटेल विरुद्ध डॉ. एम. डब्ल्यू पीडब्ल्यूएस कॉलेज यांच्यात झाली. यात दमदार कामगिरीच्या जोरावर २०-१६, २४-१८ ने नमवित विजेतेपद प्राप्त केले. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत धनवटे नॅशनल कॉलेजने आयडीसीपीई कॉलेजचा १३-९, १५-१० ने पराभव करीत तिसरे स्थान प्राप्त केले. महिला गटातील अंतिम लढतीत देखील भंडाऱ्याच्या जे. एम. पटेल कॉलेजने बाजी मारली. अंतिम लढतीत डॉ. एम. डब्ल्यू पीडब्ल्यूएस कॉलेजचा १७-११, १८-१८, २०-१७ ने मात देत जेतेपद प्राप्त केले. तिसरे स्थान बॅरि. एस. के. वानखेडे कॉलेजने प्राप्त केले. वानखेडे कॉलेजने कमला नेहरु महाविद्यालयाचा १४-१०, १२-१० ने नमवित बाजी मारली. स्पर्धेतील विजेत्यांना डॉ. विजय दातारकर, डॉ. यशवंत पाटील, डॉ. संजय चौधरी, डॉ. अमर चकोले, प्रवीण वाहले, डॉ. अंकुश घाटे, डॉ. सौरभ मोहोड, डॉ. शरद सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत पुरस्कृत करण्यात आले.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाला कांस्यपदक अ. भा. कॅनाइंग-कायाकिंग स्पर्धा

चंदीगड विद्यापीठाच्या यजमानपदाखाली पार पडलेल्या अखिल भारतीय कॅनाइंग-कयाकिंग स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने कांस्यपदक प्राप्त केले. चंदीगढ येथे झालेल्या स्पर्धेत पुरुषांच्या गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने २०० मीटर ड्रायगन बोट प्रकारात तिसरे स्थान प्राप्त केले. संघाने १ मिनिट २७.७५ अशी वेळ देत कांस्यपदक आपल्या नावे केले.

सुवर्णपदक पंजाबी विद्यापीठ पतियाळाने १ मि. २३.४५ अशी वेळ देत मिळविले. तर रौप्यपदक चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाने १ मि. २४.७८ अशी वेळ देत प्राप्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विजयी संघात अमिर निंबर्ते, गौरव निंबर्ते, करन शेंडे, करन वाघाये (एनपीडब्ल्यू कॉलेज, लाखनी), चैतन्य खोब्रागडे (हिस्लॉप कॉलेज), आकाश उके (जेएम पटेल कॉलेज, भंडारा), तन्मय कहाते, हर्षल सहाने, ललित वैद्य (एसबी सिटी कॉलेज), श्रीवंत शेंडे (आर्ट्स कॉमर्स अँड सायंस जवाहरनगर), अंशुमन ढबाले (राजकमल तिडके कॉलेज मौदा), अनिकेत नागोसे, सुमित खुणे, मयुर मरस्कोल्हे (सर्व एमबी पटेल कॉलेज साकोली). प्रशिक्षक- सुभाष जमजारे, व्यवस्थापक- प्रवीण देऊळकर. विद्यापीठाच्या यशस्वी संघाची निवड डॉ. बी. एस. पवार यांच्या अध्यक्षतेत डॉ. अमित टेंभुर्णे, डॉ. चंद्रमोहनसिंह बिश्त, डॉ. सुधीर सहारे, डॉ. रोमी सी. बिश्त यांनी केली. विद्यापीठ संघाने मिळविलेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला. तर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी विजयी संघाचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.




# बौद्धिक संपदा हक्क विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

## विद्यापीठाच्या संशोधन व विकास सेल आणि आयक्यूएसी यांचे संयुक्त आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क (पेटंट आणि औद्योगिक डिझाइन) या विषयावर सहावी एक आठवड्याची राष्ट्रीय कार्यशाळा १८ ते २२ मार्च २०२४ दरम्यान पार पडली. गणित विभागाच्या रामानुजन हॉल येथे ही राष्ट्रीय कार्यशाळा संशोधन व विकास सेल, पदव्युत्तर विधी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. या कार्यशाळेत 120 पेक्षा अधिक संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यशाळेचे आयोजन पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे, विद्यापीठाच्या संशोधन आणि विकास सेलचे संचालक डॉ. दादासाहेब कोकरे व अंतर्गत गुणवत्ता आश्वासन सेल संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी केले होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश पेटंट खरेदी, अंमलबजावणी आणि खटल्याच्या विविध पैलूंचा शोध घेणे हा होता. बौद्धिक मालमत्तेचे विहंगावलोकन ते आंतरराष्ट्रीय फाइलिंग रणनीती, प्री-ग्रँट आणि पोस्ट-ग्रँट विरोधी प्रक्रिया ते विज्ञान आणि IPR क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मदतीने युटिलिटी आणि डिझाइन पेटंटपर्यंतचे विषयांवर विविध सत्रांमध्ये या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान तज्ञ वक्ते व सहभागी संशोधक यांनी परस्पर चर्चा केली. बौद्धिक मालमत्तेच्या जटिल नोंदणी प्रक्रिये बाबत आवश्यक असलेले मौल्यवान ज्ञान आणि कौशल्ये या कार्यशाळेतून संशोधकांनी प्राप्त केली. या कार्यशाळेत नाविन्यपूर्ण आणि आर्थिक वाढीसाठी सतत शिक्षण आणि नेटवर्किंगचे महत्त्व अधोरेखित केले गेले.

कार्यशाळेची सुरुवात सोमवार, १८ मार्च रोजी कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यात पेटंट्स आणि डिझाइन्सचे उपनियंत्रक श्री. निर्माल्य सिन्हा (RGNIIPM) हे प्रमुख पाहुणे होते. CSIR-NEERI मुख्य शास्त्रज्ञ डॉ. राजेश बिन्नीवाले यांनी संशोधन अभ्यासकांसाठी पेटंटचे महत्त्व या विषयावर व्याख्यान दिले. सुश्री मानसी पुसदकर, पेटंट एजंट यांनी पेटंट एजंट आणि पेटंट नसलेल्या आविष्कार या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर पेटंट एजंट डॉ. प्रिती तायडे यांचे पेटंट वैशिष्ट्यांवर व्याख्यान झाले. यावेळी आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांची उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी, पेटंट ॲटर्नी श्री अर्घ्य रॉय आणि डॉ उषोशी गुहा यांनी पेटंट दावा मसुदा तयार करणे. पेटंट फाइलिंग प्रक्रिया- PCT आणि पेटंट शोध यावर चर्चा केली. तिसऱ्या दिवशी श्री.कुमार राजू, सहाय्यक. पेटंट आणि डिझाईन्स कंट्रोलर यांनी प्री-ग्रँट आणि पोस्ट-ग्रँट विरोध यावर लक्ष केंद्रित करणारे व्याख्यान दिले, नागपूर येथील पेटंट परीक्षक श्रीमती पूजा माऊलीकर यांनी पेटंट शोधावर प्रशिक्षण सत्र आयोजित केले.

चौथ्या दिवशी विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी कॉपीराइट संरक्षण आणि संशोधन यावर चर्चा केली. भारत सरकारच्या एमएसएमईचे संचालक श्री. राहुल मिश्रा यांनी एमएसएमई आणि स्टार्टअप्ससाठी पेटंट या विषयावर व्याख्यान दिले. श्री. स्वप्नील गावंडे यांनी पेटंटचे व्यावसायीकरण व अटी आणि पेटंटचे नूतनीकरण यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी एमएनएलयू नागपूर येथील डॉ. रागिणी खुबाळकर यांचे कॉपीराइट आणि साहित्यिक चोरी या विषयावर व्याख्यान आणि सुश्री अनुश्री मुक्ते यांचे युटिलिटी पेटंट या विषयावरील सत्राचा समावेश होता. समापन सत्रादरम्यान, सहयोगी प्राध्यापक, डॉ. अनुपमा कुमार, रसायनशास्त्र विभाग, व्हीएनआयटी नागपूर , प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते आणि सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले.

पदव्युत्तर विधी विभागातील सुश्री अनुश्री मुक्ते आणि श्री आबिद खान फॅकल्टी समन्वयक होते, ज्यांना विद्यार्थी समन्वयक मोहम्मद तहाउद्दीन, प्रबुद्ध दामले, झैनाब फातेमा आणि विकर्ण सिंग यांनी मदत केली. सहभागींनी सत्रांच्या गुणवत्तेची प्रशंसा केली, प्राप्त व्यावहारिक अंतर्दृष्टी आणि उद्योगातील नेते आणि समवयस्कांकडून शिकण्याची संधी दिली. सत्रांनी पेटंट कायदा आणि प्रक्रियांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली. पेटंटशी संबंधित आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी आम्हाला सुसज्ज केले. कार्यशाळेचे यश नवोन्मेषाला चालना देण्यासाठी आणि बौद्धिक संपदा अधिकारांना प्रगत करण्यासाठी चालू असलेल्या शिक्षण आणि सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.





## श्रीचक्रधर स्वामींच्या विज्ञानवादात समाजउत्थानाचा दृष्टीकोन

### - डॉ. हंसराज जाधव

**महंत नागराजबाबा महानुभाव स्मृती व्याख्यान**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनात महंत श्री नागराजबाबा महानुभाव स्मृती व्याख्यान दि.२८ मार्च रोजी सायं.५ वाजता विद्यापीठाच्या गांधी भवन सभागृह, एलएडी कॉलेज चौकाजवळ, शंकर नगर नागपूर येथे संपन्न झाले. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विज्ञानवादी विचारांची प्रासंगिकता या विषयावर डॉ. हंसराज जाधव ( सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय) पैठण जि.छत्रपती संभाजीनगर यांनी व्याख्यानातून विचार मांडले.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत व जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे संपूर्ण तत्वज्ञान आध्यात्माचा कान पकडून समाजात विज्ञान पेरणारे आहे. पारंपरिक अनिष्ट प्रथा, परंपरा व कर्मकांडाना तिलांजली देत स्वामींनी आपल्या अनुयायांना नदीमध्ये अंघोळ करायला आणि समाजाचे शोषण करणाऱ्या दशक्रिया सारख्या विधी करायला स्पष्ट नकार दिला, नदी खराब झाली तर मानवी आरोग्यावर त्याचा परिणाम होईल ही विज्ञानवादी दृष्टी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींची होती. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी फुल टाईम कार्यकर्ते होते, त्यांनी मानवी समाजाच्या उत्थानासाठी आपल्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन दिला असे विचार व्याख्याते डॉ. हंसराज जाधव यांनी व्यक्त केले.

चक्रधर स्वामींनी पारंपरिक प्रथा, परंपरा मोडीत काढून समाजाला नवी जगण्याची प्रेरणा दिली. अध्यात्मिक क्षेत्रात वैज्ञानिक सत्य सांगणारे ते एकमेव महात्मे होते. असे मत व्याख्यानमालेचे अध्यक्ष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी व्यक्त केले. महानुभाव साहित्य आणि तत्त्वज्ञानाचा आंतरविद्या शाखीय पद्धतीने महानुभावांचे योगशास्त्र, मानसशास्त्र, आहारशास्त्र या संदर्भात नाविन्यपूर्ण संशोधन व्हायला हवे असे मत भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनाचे प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री यांनी प्रास्ताविकात व्यक्त केले. व्यासपीठावर प्रा. प्रमोद वाटकर (गांधी विचारधारा विभाग प्रमुख ) प्रामुख्याने उपस्थिती होती. या व्याख्यानाचे सुत्रसंचालन डॉ. विजया राऊत, व्याख्यात्यांचा परिचय डॉ. प्रतिभा कोकाटे, आभार श्री राजकुमार शेंडे यांनी मानले. या व्याख्यानाला महानुभाव साहित्य व तत्वज्ञानाचे अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्नातकोत्तर संस्कृत विभागात उस्फूर्त वक्तृत्व स्पर्धा
### धरमपेठ महाविद्यालयाची हेतवी पटेलने पटकावला प्रथम क्रमांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने उस्फुर्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या वकृत्व स्पर्धेमध्ये धरमपेठ महाविद्यालयाची हेतवी पटेल हिने प्रथम क्रमांक तर संस्कृत विभागाची बाईसा चव्हाण हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्नातकोत्तर संस्कृत विभाग प्रमुख डॉ. शुचिता दलाल तर प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी संघटना प्रमुख प्रा. प्रतिभा परेतकर, तत्त्वज्ञान विभागाच्या माजी विभाग प्रमुख प्रा. सुनिता इंगळे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत मुंडले धरमपेठ महाविद्यालय, तत्त्वज्ञान विभाग, मराठी विभाग, संस्कृत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्वयंपूर्ण वक्तृत्व स्पर्धा असल्याने विषयाची चिठ्ठी स्पर्धकांनी उचलून भाषण करावयाचे होते. या स्पर्धेचे परीक्षण मृणाली टेंभेकर व धनश्री पात्रीकर यांनी केले. इंद्रधनुष्य, आयुष्यातील सिग्नल्स, कोर्ट मॅरेज, व्हाट्सअप, मोबाईल नसता तर, पर्यावरण, गृहस्थाश्रम, वसुधैव कुटुंबकम, मातृभाषा, आपलं नागपूर, आपली निवड, हस्ताक्षरांचे सौंदर्य, ईश्वर खरंच आहे का?, मैत्री, ज्योतिष्य शास्त्रातील कुंडली, कालिदास, विविध कला आदी विषय वक्तृत्व स्पर्धेसाठी देण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. चार प्रोत्साहनपर पुरस्कार संस्कृत विभागातील बिना नगराळे, तत्त्वज्ञान विभागातील मिथुन मेश्राम, वैशाली फुले व चंद्रकांत कासुडे यांनी प्राप्त केला. विविध विषयावर घेण्यात आलेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारी होती अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढेल असे डॉ. शुचिता दलाल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. प्रा हर्षदा पात्रीकर यांनी गीत गायन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. तनुजा वाघमारे यांनी केले. यशस्वीतेसाठी वैभव बरगत, मोनिका शुक्ला, प्रा. लीना पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## संस्कृत विभागात राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात
### कला शाखांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन विषयावर चर्चा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभाग आणि पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळा शुक्रवार, दिनांक २२ मार्च २०२४ रोजी पार पडली. कला शाखांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेत चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन इतिहास व पुरातत्व विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. चंद्रशेखर गुप्ता यांच्या हस्ते पार पडले. प्रा. हर्षदा पात्रीकर यांनी सरस्वती वंदना गायन केली. मध्यप्रदेश भोपाल येथील शासकीय रामानंद विद्यापीठातील डॉ. गणेश त्रिपाठी यांनी कार्यशाळेचे बीजभाषण केले. डॉ. त्रिपाठी यांनी ज्योतिष शास्त्राचे महत्व विविध विषयातून प्रस्तुत केले. त्यामध्ये कुंडली, नक्षत्र, राशी आदी विविध विषयावर प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात विदर्भ संशोधन मंडळ नागपूर येथे कार्यरत श्री शेषशयन देशमुख यांनी पीपीटीद्वारे 'शिल्पकला तथा साहित्य' या विषयावर माहिती दिली. यावेळी त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनामध्ये विदर्भातील मार्कंडेय तथा गुजरात राज्यातील राणीची वाब याबाबत माहिती दिली. मूर्तींच्या विविध प्रकाराबाबत त्यांनी माहिती देत ऐतिहासिक दृष्टिकोन तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन चित्राद्वारे सांगितला. या सत्राला तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम उपस्थित होते तर द्वितीय सत्रामध्ये मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी मार्गदर्शन केले.

संस्कृत विभाग प्रमुख डॉ. शुचिता दलाल यांनी 'कला शाखांमधील वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन' याविषयी कार्यशाळा घेण्यामागील उद्देश सांगितला. कला शाखांमधील विशिष्ट ज्ञान तसेच विज्ञानानुसार विज्ञान शब्दा कशाप्रकारे उपयुक्त होऊ शकतात, अशी माहिती त्यांनी दिली. विज्ञान शाखेचे महत्त्व पूर्वी होते, आज आहे आणि भविष्यात देखील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तृतीय सत्रामध्ये धनवटे नॅशनल कॉलेजच्या माजी विभाग प्रमुख डॉ. भारती खापेकर उपस्थित होत्या. महाभारताचे अनुवाद, संस्कृत ते मराठी तसेच मराठी ते संस्कृत या विषयावर त्यांनी विस्तृत चर्चा केली. महाभारतामध्ये प्राप्त विविध शब्द, त्याचे अर्थ याचा अनुवाद करताना अनुवादकांना दोन्ही भाषेचे ज्ञान आवश्यक होते, असे त्यांनी उदाहरण देत स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन लीना पांडे विद्यापीठ गीत प्रा हर्षदा पात्रीकर तर विविध सत्रातील संचालन मोनिका शुक्ला, गौरी दुग्गलवार, डॉ. तनुजा वाघमारे यांनी केले. अत्यंत सुंदर अशी रांगोळी अश्विनी सोमकुवर यांनी काढली. या कार्यशाळेत माजी विद्यार्थी कौशल रामटेके, मृणाल यांच्यासह धरमपेठ महाविद्यालय, मराठी विभाग व तत्त्वज्ञान विभागातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर संस्कृत विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने उस्फुर्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या वकृत्व स्पर्धेमध्ये धरमपेठ महाविद्यालयाची हेतवी पटेल हिने प्रथम क्रमांक तर संस्कृत विभागाची बाईसा चव्हाण हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्नातकोत्तर संस्कृत विभाग प्रमुख डॉ. शुचिता दलाल तर प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी संघटना प्रमुख प्रा. प्रतिभा परेतकर, तत्त्वज्ञान विभागाच्या माजी विभाग प्रमुख प्रा. सुनिता इंगळे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत मुंडले धरमपेठ महाविद्यालय, तत्त्वज्ञान विभाग, मराठी विभाग, संस्कृत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्वयंपूर्ण वक्तृत्व स्पर्धा असल्याने विषयाची चिठ्ठी स्पर्धकांनी उचलून भाषण करावयाचे होते. या स्पर्धेचे परीक्षण मृणाली टेंभेकर व धनश्री पात्रीकर यांनी केले. इंद्रधनुष्य, आयुष्यातील सिग्नल्स, कोर्ट मॅरेज, व्हाट्सअप, मोबाईल नसता तर, पर्यावरण, गृहस्थाश्रम, वसुधैव कुटुंबकम, मातृभाषा, आपलं नागपूर, आपली निवड, हस्ताक्षरांचे सौंदर्य, ईश्वर खरंच आहे का?, मैत्री, ज्योतिष्य शास्त्रातील कुंडली, कालिदास, विविध कला आदी विषय वकृत्व स्पर्धेसाठी देण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. चार प्रोत्साहनपर पुरस्कार संस्कृत विभागातील बिना नगराळे, तत्त्वज्ञान विभागातील मिथुन मेश्राम, वैशाली फुले व चंद्रकांत कासुडे यांनी प्राप्त केला. विविध विषयावर घेण्यात आलेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारी होती अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढेल असे डॉ. शुचिता दलाल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. प्रा हर्षदा पात्रीकर यांनी गीत गायन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. तनुजा वाघमारे यांनी केले. यशस्वीतेसाठी वैभव बरगत, मोनिका शुक्ला, प्रा. लीना पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.




## सहकार्याच्या भावनेने करावे - डॉ. संजय दुधे
## विद्यापीठात सेवानिवृत्ती कर्तव्यपूर्ती सोहळा

कर्तव्याच्या ठिकाणी सहकार्याच्या भावनेने कार्य करावे असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा कर्तव्यकृती सोहळा शनिवार, दिनांक ३० मार्च २०२४ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, विज्ञान व तंत्रज्ञान सहअधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर यांची उपस्थिती होती. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांच्या हस्ते स्थावर विभागातील उच्चश्रेणी लिपिक श्री सुरेश भिकनजी मासुरकर व गोपनीय विभागातील उच्च श्रेणी लिपिक श्री मोहन केशवराव बोबडे यांचा सेवानिवृत्त निमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना डॉ. दुधे यांनी व्यक्तीने जीवनात समाजाला देखील तितकेच महत्त्व दिले पाहिजे, त्यामुळे माणसाची ओळख निर्माण होते, असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर आभार सहअधिष्ठाता डॉ. प्रकाश इटनकर यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणी सदस्य, विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.





## शिवाजी महाराजांनी राज्यभिषेकापासून आणले स्वतःचे चलन
## दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन मुंबईचे डॉ. प्रशांत कुलकर्णी यांचे प्रतिपादन

छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यभिषेकापासून स्वतःचे चलन अस्तित्वात आणले, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका विभागाचे डॉ. प्रशांत कुलकर्णी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात स्नातकोत्तर इतिहास विभाग आणि दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठा साम्राज्याचे चलन' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद २२ मार्च २०२४ रोजी पार पडला. या परिसंवादात डॉ. कुलकर्णी मार्गदर्शन करीत होते.

